# मराठी विभाग

# आंबेडकरी चळवळीचे सामाजिक संदर्भ

प्रस्तावना :-

प्रत्येक मानव समाजाची विभागणी ही समुहात झालेली असते आणि समुहाचे वेगळेपण हे वेळोवेळी दिसून येते. भारतीय समाजाची जातीवर आधारलेली श्रेणीरचना आहे. आपल्या भारतामध्ये सर्वच समाजात जाती आढळून येतात. समाजाचे जातीमुळेच विभाजन घडून आले आहे. जातीव्यवस्थेचा समाजाच्या संरचनेवर देखील प्रभाव पडला आहे. भारतीय समाजामध्ये जातीव्यवस्थेची मुळे ही फार खोलवर रुजलेली दिसून येतात. जातीभेदाला धार्मिक भावनांना परिपाक लाभला होता, व या धार्मिक भावनांना शास्त्रांचा आधार लाभला होता. ही धर्मग्रंथ ऋषींनी लिहली असल्यामुळै त्यांना डावलने म्हणजे पाप होय, अशी लोकश्रध्दा होती, थोडक्यात जातींना दैवी आधार लाभला होता. जातीमुंळेच समाजाची जातीनिहाय श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना निर्माण झाली व या विषमतेमुळेच कनिष्ठ जातीच्या वाटयाला अन्यायाची वागणूक मिळू लागली.

हिंदु शास्त्रात असे लिहीले की, जात ईश्वराने निर्माण केली व अस्पृश्यांना सगळयात शेवटी निर्माण केली म्हणून तो अन्त्य अंतिम म्हणजे तो अन्त्यज म्हणून ओळखला जात होता. डॉ. बाबासाहेबांच्या मते अन्त्य शब्दाचा अर्थ निर्मीतीच्या शेवटचा नसून गावाच्या शेवटचा असा होतो. गावाच्या बाहेर जे लोक राहत होते त्यांना दिलेले हे नाव म्हणून अन्त्यज म्हणण्याचा प्रघात पडला. अशाप्रकारे सर्व जीवन अस्पृश्य म्हणूनच व्यतीत करावे लागत असे. १९३५ साली भारत सरकारच्या वतीने हिंदू धर्मातील अस्पृश्य जातींची एकूण संपूर्ण यादी ४२९ होती व ती १९४५ ते १९४६ या वर्षी अस्पृश्यांची संख्या सहा कोटी होती. या सहा कोटी लोकांचा सवर्णांना साधा स्पर्श देखील चालत नसे अस्पृश्यांना ही अपवित्रता जन्मतःच मिळत असे व ते अस्पृश्य म्हणून जन्मास येत व अस्पृश्य म्हणूनच मरणार असत. अस्पृश्यांची निवासस्थाने हे नेहमी गावाच्या बाहेत असे, जर आजही आपण काही खेडोपाडी एक कटाक्ष टाकला तर आपल्या असे लक्षात येते की,सवर्णांचे निवासस्थान हे गावामध्ये असते, तर अस्पृश्यांना गावाबाहेरच राहावयाचे निर्बंध लादले गेले होते.

अशाप्रकारे सार्वजनिक पाणवठे, तलाव, विहिरी, मंदिरे पासून दुर राहण्यास सांगितले. तसेच खानपानविषयक बंधने जसे त्यांनी चांगला आहार घेवू नये अशी बंधने घातली होती. म्हणून अस्पृश्य माणूस असून देखील त्याला माणसाची वागणूक मिळत नसे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :-

१. जात ही संकल्पना स्पष्ट करणे.

२. अस्पृश्यता ही संकल्पना समजून घेणे.

३. अस्पृश्यता नष्ट करण्याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला आहे व शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. विविध संदर्भ ग्रंथ व प्रकाशित साहित्ये याचा उपयोग करण्यात आला आहे.

विषय विवेचन :-

जात हा मराठी शब्द जण या धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ जन्म असा होतो. एकप्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जात इंग्रजी शब्द या शब्दावरुन बनला आहे. या पोर्तुगीज शब्दाची व्याप्ती या शब्दावरुन बनला आहे. या पोर्तुगीज शब्दाची व्याप्ती या लॅटीन शब्दातून आली. या शब्दाचा अर्थ वंशाची शुध्दता असा ओ. हा शब्द पोर्तुगीजांनी वंश शुध्दतेला उद्देशून १५३७ मध्ये गोवा मंडळाच्या हुकूमनाम्यात प्रथम वापरला, पण जाती हे वंशशुध्दतेचे निदर्शक नाही. जातीचा आणि वांशिक शुध्दतेचा कोणताच संबंध नाही, तरी देखील जातीला इंग्रजीमध्ये पर्यायी शब्द म्हणून  हा शब्द रुढ झाला. जाती व्यवस्थेचे विश्लेषण करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जात हा शब्द समान दर्जाचा नाही जात असमानतेवर आधारीत आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे, आणि मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्युनक्रम मिळतो. अशाप्रकारे भारतीय समाजाचे वेगवेगळया जातीत विभाजन जे व्यक्तीच्या जातीवरुन निश्चित झाले असून व्यक्तीचा जन्म ज्या जातीत झाला त्या जातीचा दर्जा व्यक्तीला मिळतो. व्यक्तीला जात बदलता येत नाही.

जातीची व्याख्या :-

डॉ बाबासाहेब आंबेडकर बहिःर्गत विववाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होो म्हणजे जातीची निर्मिती होय. जात हि एक बंद वर्ग आहे. थोडक्यात, जात हा एक अंतर्विवाहीत गट असून त्यांचे सदस्यत्व हे केवळ जन्मानेच प्राप्त होते, आणि प्रत्येकाचा दर्जा हा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो.

जातीची वैशिष्टये :-

१. प्रत्येक व्यक्ती विवाह आपल्याच जातीत करत असे म्हणजेच अंतर्विवाहाचा नियम

पाळत असे.

२. प्रत्येक व्यक्ती ही आहार व खानपानाशी संबंधीत नियम पाळीत असे.

३. जातीची विशिष्ट अशी श्रेणीरचना असे हयामध्ये श्रेष्ठ उच्च स्थानी तर कनिष्ठ निम्न स्थानी असत.

४. व्यक्तींना जी जात माता पित्याकडून प्राप्त होते तीच आयुष्यभर सोबत असे.

५. जातपंचायतीने घालून दिलेले नियमांचे सदैव पालन करावे लागत असे अन्यथा जात बहिष्कृत केले जाई.

६. व्यवसाय निवडीवर निर्बंध घालण्यात आले होते.

अस्पृश्यतेचा अर्थ :-

प्राचीन काळी अस्पृश्यतेचा उगम झाला असे सनातनी हिंदूचे मत होते. त्यांच्या मताच्या समर्थनासाठी ते पुढे असेही म्हणतात की, अस्पृश्यता पाळणे हे कितीतरी काळापूर्वीच्या धर्म सूत्रांमध्ये सांगितले होते व ज्या धर्मसुत्रात असे सांगितले त्याचे परिक्षण केल्यास असे आढळून आले की, अस्पृश्य म्हणजेच स्पर्श करण्यास अयोग्य असाच आहे. धर्मसुत्रांमध्ये अस्पृश्य या शब्दाला अनेक पर्यायी शब्द सांगितले आहेत, जसे अंत्य, अंत्यज, अंत्यवासी आणि बाहय इ. िंहश णर्पीीलहरलश्रशी या प्रबंधात बाबासाहेबांनी लिहिले की, सनातनी हिंदूंना अस्पृश्यता हि सामान्य आणि नैसर्गिक बाब आहे असे वाटते. त्यामुळे ते स्पृश्य अस्पृश्यताची भावना बाळगतात, परंतू अलिकडच्या हिंदूना म्हणजेच आजच्या नव्या पिढीला माहिती आहे, की अस्पृश्यता पाळणे केवळ जातीवरुन कुणा व्यक्तीला कमी लेखावे हे साफ चुकीचे आहे. परंतू हे सहजासहजी बोलण्यास धजत नाही.

डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना उत्पत्तीबद्दल पुढील निष्कर्ष काढतात :-

१. सवर्ण व असपृश्य यात कुठलाही फरक नाही.

२. पूर्वी लोकांच्या टोळया असत काही टोळया या संघटित असत एखादेवेळेस बाहय आक्रमणामुळे ही टोळी पराभूत होवून विस्कळित होत असत. व या विस्कळीत झालेल्या लोकांनाच पुढे अस्पृश्य समजण्यात येवू लागले.

३. अस्पृश्यतेला, व्यवसायाचा उद्योगधंद्याचा व वंशभेदाचा आधार नाही.

४. ब्राम्हण जसा बौध्दांचा तिरस्कार करीत तसाच या जीत लोकांचा सुध्दा करीत.

५. जीत लोकांनी गोमांस भक्षण सुरुच ठेवले, इतरांप्रमाणे त्यांनी ते सोडून दिले नाही व हे आहार देखील अस्पृश्यतेच्या उगमाची कारणे आहेत.

जाती आणि अस्पृश्यता निवारणार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :-

हिंदुंनी अस्पृश्यांवर हजारो वर्ष अत्याचार केले आहेत. अस्पृश्यांची सावली कोणा हिंदूवर पडू नये, त्यांच्या पावलांमुळे रस्ते विटाळू नये म्हणून कंबरेला बोराटीचा फास बांधून गावात फिरावे लागत असे, अस्पृश्यांच्या गळयात थुंकण्यासाठी मडके व ओळख म्हणून मनगटात काळा दोरा घालण्याचे बंधन होते, इतकेच नव्हे तर त्यांना चांगले कपडे वापरणे, अंगावर दागिणे घालणे, आहारात तुपाचा समावेश करणे कोणी शेती केली वा कोणी घरे बांधली तर हिंदुच्या अंगाचा तिळपापड होत असे व ते अस्पृश्यांना झोडपून काढत असत. जातीतील श्रेष्ठ व कनिष्ठ या मुद्यावर हिंदू लोक परस्परांशी सदैव भांडणतंटे करीत असत अस्पृश्यांना विहिरी, तलाव या ठिकाणी मज्जाव करण्यात आला होता. जातीय विषमता हि पराकोटीला पोहचली होती. हि विषमता नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना जागृत केले, त्यांना त्यांच्या अधिकाराबाबत माहिती दिली व आंदोलनासाठी उभे केले, त्यातुनच रत्नागिरी येथील महाड चा सत्याग्रह, नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह या सारख्या चळवळी उभ्या केल्या व या चळवळीतून अस्पृश्यांच्या गुलामगिरीचा प्रश्न सर्वांसमोर आणला आणि राष्ट्रीय चळवळ करणाऱ्यांना खडसावून सार्गितले की हा अस्पृश्यांचा मुक्तीचा मार्ग आहे त्याकडे कानाडोळा करुन दुर्लक्ष करता येणार नाही. अस्पृश्याांची स्थिती सुधारण्यासाठी व त्यांच्या हक्क आणि समानता व न्याय मिळवून देण्यासाठी व माणुसकीसाठी शोषणाविरुध्द चालु असलेल्या लढयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना एकजुटीने एकत्रित आणले.

महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह :-

पाणी हे निसर्गनिर्मित परंतु त्यावर देखील सवर्णांचाच हक्क अस्पृश्यांनी कुठून पाणी घ्यावे व घेवू नये हे सवर्ण निश्चित करीत असत. कधी कधी तर अस्पृश्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती होत असे. सार्वजनिक नदी, तलावे, पाणवठे येथील पाण्याचा उपयोग सर्व गुरे-ढोरे, पशु-पक्षी करिता केला जायचा. परंतु अस्पृश्यांना तेथे मज्जाव केला जात असे म्हणून पाण्यावर कुण्या एका धर्माचा अधिकार नाही व ते पाणी अस्पृश्य प्यायल्याने पाणी विटाळत नाही व त्या पाण्यावर जितका अधिकार सवर्णाचा आहे तिकाच अधिकार अस्पृश्यांचा आहे. हे सिध्द करण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे चवदार तळयासाठी सत्याग्रह केला.

समाज सुधारणेच्या आंदोलनातील हा महाडचा उठाव हा जातीयतेविरुध्द असलेला पहिला

संघर्ष होता. २० मार्च १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील विविध खेडयापाडयातून हजारो स्त्री पुरुष चवदार तळयाजवळ एकत्रित आले व सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळयातील पाणी ओंजळीत घेऊन प्राशन केले व त्यानंतर हजारो अस्पृश्यांनी ते पाणी प्राशन केले परंतू विटाळलेले पाणी शुध्द करण्यासाठी सनातनी हिंदुंनी गाईचे शेण पाण्यात मिसळून तलावात फेकले आणि अस्पृश्यांनी स्पर्श करुन विटाळलेला तलाव अशा पध्दतीने शुध्द करुन घेतला. सत्याग्रह झाल्यानंतर तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले नाही, परंतु हया घटनेमुळे साऱ्या भारतातीलच अस्पृश्य समाजात जागृती निर्माण झाली.

दिवसा-ढवळया असंख्य लोकांनी एकत्रित येवून तळयातील पाणी प्यावे ही या देशातील एक ऐतिहासिक व महत्वाची घटना होती.

मनुस्मृतीचे दहन :-

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जे काही कार्य करीत होते ते हिंदू धर्माच्या विरुध्द नव्हते, तर हिंदू धर्मातील जातीभेद नष्ट करण्याकरिता होते. जातीव्यवस्थेची चौकट ईश्वरनिर्मित असल्या कारणाने अस्पृश्य निवारणार्थ कोणत्याही समाज सुधारकाने उल्लेखनीय असे कार्य केले नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या लक्षात आणून दिले की, जाती हया ईश्वरनिर्मित नाही तर त्या मानव निर्मित आहेत. व ज्या मनुस्मृतीत मनूने अस्पृश्यांबद्दल अवहेलना केली होती. शुध्द्र व स्त्रियांना हिन दर्जा दिला होता. जनसमुदायावर धर्माचा पगडा असल्यामुळे मनुस्तृतीमध्ये असे लिहिले ते सत्यच आहे, त्यामुळे ज्या मनुस्मृतीत स्त्री व शुद्राबद्दल वाईट लिहिले ती मनुस्मृतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधीवत दहन केली. अन्यायाविरुध्द चालविलेला त्यांचा हा लढा होता. धर्माच्या ईश्वराच्या नावाखाली अस्पृश्य व स्त्रियांना राबवून घेतले जात असे व त्यांचे शोषण होत असे. शुद्रांनी संपत्तीचा संचय करु नये, भिक्षा मागावी, स्वच्छ राहू नये मृत जनावरे ओढून गावाबाहेर न्यावीत ही कामे मनुस्मृतीत सांगितली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या त्यांच्या बहिष्कृत भारत नावाचे पाक्षिक मध्ये लिहतात की, आम्ही ज्या मनुस्मृती चे वाचन केले आहे त्यावरुन आमची खात्री झाली आहे की, त्या ग्रंथात शुद्र निंदा करणारी त्यांचा उपमर्द करणारी कुटाळ उत्पत्तीचा कलंक त्यांच्या माथी मारणारी व त्यांच्या विषयी समाजात अनादर वाढवणारी वचने ओतप्रोत भरलेली आहे त्यात धर्माची धारणा नसून असमानतेची धुळवळ घातली आहे, हे दर्शविण्यासाठी आम्ही मनुस्मृतीचे होळी करीत आहोत. ही उभ्या भारतात अन्याय व विषमतेविरुध्द चालवलेलीप्रथमच घटना होती, म्हणून मनुस्मृतीची होळी ही अस्पृश्यांना

सामाजिक गुलामगिरीतुन मुक्ती मिळविण्यासाठी उचललेली यशस्वी वाट होती.

काळाराम मंदीर सत्याग्रह :-

ईश्वराचे दर्शन घेणे वा ईश्वराला प्रसन्न करणे हा हेतू काळाराम मंदीर प्रवेश करण्यामागे नव्हता तर सार्वजनिक ठिकाणी जेथे सगळयांना जाता यावे अस्पृश्य व कनिष्ठ जातीतील लोक हे हाडामांसाचीच माणसे आहेत. त्यांना ही मंदीरात सवर्णांप्रमाणे प्रवेश असावा व तो मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शर्थीचे प्रयत्न केलेत. मंदिरात प्रवेश केल्याने देवालय भ्रष्ट होत नाही की मुर्तीचे पावित्र ही कमी होत नाही. अस्पृश्य समाजावर जेथे जेथे अन्याय करणारी भक्ती स्थळे होती ते सर्वांवर प्रहार करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत होते. मंदीर प्रवेशाने कोणत्याही अस्पृश्याच्या मुक्ती प्राप्त होत नव्हती. त्यांचे दुःख कमी होत नव्हते की त्यांची लाचारी संपणार नव्हती, तर इतर हिंदू व्यक्तीप्रमाणे आम्हालाही मंदीरात प्रवेश करण्याचा हक्क आहे व तो हक्क बजावण्याकरिता हा लढा होता. समानतेचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांना मंदीर प्रवेश हवा होता. २ मार्च १९३० पर्यंत नाशिक येथील काळाराम मंदीराच्या दरवाज्याजवळ सत्याग्रहींनी धरणे धरली. मंदीराचे दारे मात्र सतत बंद होती. ७ एप्रिल ला रामनवमी रोजी स्पृश्य आणि अस्पृश्य दोघांनी मिळून रामाचा रथ ओढावा असे ठरले पण अस्पृश्य तरुण रथाला स्पर्श करण्यापूर्वी स्पृश्यांनी रथ पळवून नेला व अस्पृश्य तरुणांवर तुफान दगडफेक करण्यात आली त्यांना मारहाण झाली व तुरुंगात जावे लागले. सतत ३ वर्षे मंदीर प्रवेशासाठी अस्पृश्यांनी लढा दिला. परंतु सनातनी सवर्ण हिंदूचे ह्दयपरिवर्तन काही होवू शकले नाही.

दीर्घकाळ चाललेल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहामुळे सगळा नाशिक जिल्हा ढवळून निघाला. अस्पृश्यांवर बहिष्कार घालण्यात आला. त्यांना गावबंदी, रस्तेबंदी व शाळाबंदी करण्यात आले. त्यांच्यावर हल्ले होत असत, ज्या धर्मात प्रेम नाही, बंधुत्व नाही, पाणी पिण्याचा साधा अधिकार नाही. जनावरांपेक्षाही वाईट वागणूक ज्या ध्मार्त मिळते त्या धर्मात राहण्याचा काही अर्थ नाही, म्हणून इथेच धर्मांतराचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात रुजला असावा असे दिसते.

धर्मांतर :-

१३ ऑक्टांबर १९३५ रोजी नाशिक जिल्हयातील येवला येथे अखल दलित परिषद भरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रश्न उपस्थित केला जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क देईल आणि योग्य तऱ्हेने वागविल अशा एखाद्या धर्मात जावे असे तुम्हास

वाटत नाही का? हिंदू धर्माशी असलेला संबंध तोडा, ज्या धर्मात समान दर्जा, समान संधी व समान वागणूक मिळते अशा धर्मात प्रवेश करा. असे आवाहन त्यांनी केले तसेच त्यांच्या मते हिंदू धर्म हा पुर्वजांचा धर्म नसून तो त्यांच्यावर जबरदस्तीने लादलेली एक गुलामगिरी आहे.
धर्मांतर कां? यावरच युक्तीवाद करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, स्पृश्य-अस्पृश्य यांच्या कलहातून अस्पृश्यांना सुटका करुन घेण्यासाठी इ. बाबींची गरज आहे. एक मनुष्यबळ दुसरे द्रव्यबळ व तिसरे मानसिक बळ पण मनुष्यबळाच्या दृष्टीने अस्पृश्य अल्पसंख्य आहेत. द्रव्यबळ व मानसिक बळ आत्मविश्वास, उत्साह, महत्वाकांक्षा नसलेल्या अस्पृश्यांत प्रतिकारासाठी आवश्यक ते सामर्थ्य नाही आणि हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांचे कल्याण होणार नाही म्हणून ऐच्छिक कल्याणासाठी धर्मांतराची आवश्यकता आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म ही धर्माची व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य होती. परंतु हिंदू धर्मात अस्पृश्यांनी आत्मोन्नती होणार नाही. या धर्मात अस्पृश्यांना गौण स्थान आहे. त्यांना सहानुभूती नाही, अस्पृश्यांच्या विकासासाठी विद्या, वित्त व शस्त्र यांचे वैयक्तिक स्वातंत्र नाही, हिंदू धर्मात राहिल्यास शिवा-शिवीकरिता पाण्याकरिता, भाकरीकरिता भांडण करावे लागते म्हणून हिंदू धर्म मान्य नसल्याचा खुलासा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ॲनिहिलेशन ऑफ कास्ट मध्ये सांगतात की, भारतातील जाती या गुणानुसार नसून जन्मतःच ठरत असतात. हिंदू माणूस हा वाईट नव्हता तर त्यांचे धार्मीक ग्रंथ त्यांना अमानुष वागणुक करण्याची शिकवण देत होते, म्हणून हिंदू अस्पृश्यांवर अत्याचार करीत होते. मानवतावादी मूल्यांची रुजवणूक करण्याकरिता जातीसंस्थेचे उच्चाटन करणे अतिशय गरजेचे होते, त्याकरिता त्यांनी जातीमुळे होणारे विघटन थांबविण्यासाठी अस्पृश्योध्दार करण्याकरिता विविध सत्याग्रह केले तसेच जातीभेद नष्ट करण्याकरिता विभिन्न व विविध जातीतील व्यक्ती एकत्रित येवून सहभोजन करावे हा एकमार्ग सूचविला तसेच आंतरजातीय विवाह हा दुसरा मार्ग सुचविला.
मानसिक स्वातंत्र खरे स्वातंत्र आहे, परंतू अस्पृश्यांचे हे स्वातंत्र हिरावून घेतले आहे. बौध्दिक गुंलामगिरीत ते सापडले आहेत. धर्मांतरामुळे बोध्दिक गुलामगिरीतून अस्पृश्यांची सुटका होईल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते आधी धर्मांतर की आर्थिक उन्नती? या प्रश्नाचे उत्तर आधी धर्मांतर असे त्यांनी दिले.

माणूस धर्माकरिता नाही धर्म माणसाकरिता आहे. माणुसकी प्राप्त करुन घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. संघटना करण्यासाठी, समता व स्वातंत्र प्राप्त करुन घेण्यासाठी,

शिक्षण घेण्यासाठी, धनसंचय करण्यासाठी धर्मांतर आवश्यक आहे. जो धर्म देवळात जावू देत नाही, तो धर्म पाणी मिळू देत नाही, जो धर्म शिक्षण घेवू देत नाही, जो धर्म अशिक्षीतांना अशिक्षीतच रहा असे सांगतो अशा धर्मात अस्पृश्यांनी राहू नये असे त्यांनी आवाहन केले होते. धर्मांतरासाठी १४ ऑक्टांबर १९५६ रोजी नागपूर येथील दिक्षा भूमी ही जागा निवडली व आंबेडकरांनी सर्वच धर्माचा सखोल अभ्यास केला व बौध्द धर्म स्वीकारावयाचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो उपस्थित अनुयायांना सागितले की, आपण विषमता आणि छळवणूक यावर आधारलेल्या हिंदू धर्माचा त्याग करुन ज्ञान, सुमार्ग, करुणा या तीन तत्वावर आधारलेल्या बौध्द धर्माचा त्याग करुन ज्ञान, सुमार्ग, करुणा या तीन तत्वावर आधारलेल्या बौध्द धर्माचा स्वीकार करीत आहोत. हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरिती, रुढी-परंपरा, देव-देवता अंधश्रध्दा भोळसट समजुती इ. चा निषेध करण्यात आला होता, व बौध्द धर्मातील मानवी मूल्यांचा पुरस्कार करण्यात आला होता. अशा प्रकारे दिक्षा विधी पूर्ण झाल्यावर डॉ. बाबासहोब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांच्यासह बौध्द धर्माचा दिक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान लिहीले व त्यातील कलम अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल असा उल्लेख केल्यामुळे आज आपल्याला समाजात अस्पृश्यता दिसून येत नाही कारण कायद्यानेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशी तरतूद केल्यामुळे आज आपल्यासमोर जातीय विषमता ही दिसून येत नाही. अस्पृश्यता समुळ नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेवढे प्रयत्न केले ते सगळेच प्रयत्न यशस्वी झालेत.

कु. कांचन वि. महाजन
बी.ए. भाग - ३

# जातीभेद अस्पृश्यता निर्मुलन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान भारतीय विचारवंत होत. त्यांनी भारतीय समाजव्यवस्था प्राचीन काळातील सामाजिक जीवन, जातीव्यवस्था, अस्पृश्यता व जातीचे निर्मूलन या विषयासंबंधीचा अतिशय सखोल वस्तुनिष्ठपणे अभ्यास करुन त्या संदर्भात अनेक महत्वपूर्ण ग्रंथ लिहिलेत. डॉ. आंबेडकरांनी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक चळवळीत माणूस हा केंद्रबिंदू मानला. या आपल्या भारतात माणसाला कधीच, कोणत्याच कालखंडात केंद्रबिंदू मानलेले नव्हते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत धर्मकर्त्यांनी, ग्रंथकारांनी, धर्मशास्त्र कर्त्यांनी जातीला महत्व दिले. धर्माला जातीला, जातीसमूहाला, जातिसमाजाचा केंद्रबिंदू मानले. धर्माला, धर्मशास्त्राला अग्रस्थानी ठेवले. रुढी, परंपरेला श्रेष्ठ मानले आणि त्यामुळे माणसाची किंमत, माणसाचे महत्व याला मातीमोल केले. माणसांच्या आशा, आकांक्षा पूर्णपणे दफन करुन टाकल्या. भारतात माणसांची, त्यांच्या गुणांची, कर्तुत्वाची पूजा करण्यापेक्षा दगड, पशु-पक्षी, झाडे-पाला यांची पुजा धर्माने आणि रुढी परंपरेने करायला शिकविले. धर्मापुढे, धर्मशास्त्रापुढे रुढी-परंपरेपुढे अस्पृश्य म्हणून मानलेला माणूस पशुपेक्षाही हीन झाला. माणसासारख्या माणसाला अस्पृश्य म्हणून हीन लेखले म्ळणूनच भारताची नेहमीच पिछेहाट झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मशास्त्रे आणि धर्मग्रंथाचा वस्तुनिष्ठपणे अीयास करुन भारतीय समाजरचना, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यांचा खोलवर सखोल अभ्यास करुन भारताच्या अधोगतीची पराभवाची, मीमांसा केली. त्यांच्या मते माणूस हा केंद्रबिंदू मानल्याशिवाय भारताचे भविष्य उज्ज्वल होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शूद्र पूर्वी कोण होते? या ग्रंथात नमूद करतात की, हिंदू समाजाच्या सामाजिक इतिहासाच्या प्रश्नांचा अभ्यास धर्मग्रंथात अंतर्भूत आहे आणि हे धर्मग्रंथ टिकविण्यात ब्राम्हणांचे दोन प्रकारचे हितसंबंध गुंतलेले आहे ते म्हणजे -

१. हे धर्मग्रंथ त्यांच्या पूर्वजांची निर्मिती आहे आणि सत्याचा बळी देवूनही त्याचे संरक्षण करणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे.

२. हे धर्मग्रंथ ब्राम्हणांच्या हक्क अधिकाराला संमती देते म्हणून याला कसलाही धक्का लागेल असे कृत्य न करण्याची सावधानता ते बाळगतात.

यातूनच भारतीय समाजव्यवस्थेत वर्णवाद जातीव्यवस्था, धर्मवाद हा शोषणाचा कुटील मार्ग

हजारो वर्षे इथे रुजला. त्याची मुळे भारतीय समाजात खोलवर रुजावी म्हणून धर्म, धर्मग्रंथ, पुनर्जन्म, मोक्ष, आत्मा यांच्या नावावर उच्चनीचतेचे विष लोकांमध्ये पेरल्या गेले.

डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदूतील अस्पृश्यता ही एक विचित्र आणि जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही भागातील मानवतेला अपरिचित गोष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य मुळचे कोण? आणि ते अस्पृश्य कसे बनले? या ग्रंथात स्पष्टीकरण देतात की, अस्पृश्यतेचा उगम हा दोन गोष्टीमुळे झाला आहे त्या म्हणजे.

१. बौध्द धर्माबद्दलचा तिरस्कार हे अस्पृश्यतेचे मूळ आहे.

२. गोमांस भक्षण हेच अस्पृश्यतेच्या उत्पत्तीचे कारण आहे.

याचे स्पष्टीकरण देताना डॉ. आंबेडकर म्हणतात, जेव्हा अस्पृश्य लोक अस्पृश्य नव्हते तर ते वाताहत झालेले लोक असून ते बौध्द धर्मीय होते. ब्राम्हणांना ते पूज्य मानीत नसल्यामुळे पौराहित्याचे काम देत नव्हते. दुसरीकडे बौध्द धर्मीय असल्यामुळे ब्राम्हणही त्यांचा द्वेष करीत होते आणि त्यांच्याबद्दलच्या द्वेष आणि तिरस्काराचा प्रसार आपल्या प्रवचनातून करीत होते. याचा परिणाम असा झाला की, या वाताहत झालेल्या अर्थात बौध्द लोकांना अस्पृश्य मानण्यात आले. वाताहत झालेल्या या लोकांनी ब्राम्हणांचा तिरस्कार करण्याचे कारण म्हणजे ब्राम्हण हे बौध्द धर्मियांचे शत्रु होते आणि ब्राम्हणांनी वाताहत झालेल्या लोकांवर अस्पृश्यता लादण्याचे कारण म्हणजे ज्यांनी बौध्द धर्म सोडला नाही हे होय.

अस्पृश्यतेच्या उत्पत्तीचे एक कारण म्हणजे गोमांस भक्षण देखील हे अस्पृश्यतेची भावना अधिक तीव्र होण्याचे कारण आहे. वाताहत झालेल्या लोकांनी बौध्दधर्मीय असण्याच्या जोडीलाच त्यांनी आपली गोमांस भक्षणाची सवय सुरु ठेवली. यामुळे ब्राम्हणांना दुखविण्यास ते कारणीभूत ठरले. कारण समाजाने बौध्द धर्माच्या अहिंसा तत्वांचा स्वीकार करुन जी पकड घेतली होती त्याला शह देण्यासाठी ब्राम्हणांनी मांसभक्षण टाळले व ते शाकाहारी बनले. यामुळे ब्राम्हणांना आणखी दुखविण्यास कारणीभूत ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नमूद करतात की, चार्तुवर्ण्य व्यवस्थेची परिणती जातीव्यवस्थेत झाली आहे. अस्पृश्यता हे जातीव्यवस्थेच्या विषवृक्षाला आलेले महाविषारी फळ आहे. भारतीय खेडी जातीयतेची आणि अस्पृश्यतेची आगारे आहेत. या मुलभूत अवस्थेला जोवर हातातला जात नाही आणि ग्रामीण भागातून जातीविहीन, मसतेचे समाजजीवन निर्माण होत नाही तोवर जुजबी उपायांनी जातीयतेचे व अस्पृश्यतेचे समूळ निर्मूलन होणे शक्य नाही.

डॉ. बाबासाहेब स्पष्ट करतात की, एखादा समाज जगतो की मरतो हा प्रश्न महत्वाचा नाही तर तो कोणत्या पातळीवर जगतो, हा महत्वाचा प्रश्न आहे. जगण्याच्या अनेक पध्दती आहे. परंतु

सर्व सारख्याच सन्माननीय नाहीत. व्यक्तींसाठी काय किंवा समाजासाठी काय नुसते जगणे आणि भलेपणाने जगणे यांच्यामध्ये मोठे अंतर असते. युध्दात लढणे आणि शूरांचे जीवन जगणे ही जगण्याची एक पध्दती आहे तर पळून जाणे, शरण जाणे व गुलाम म्हणून जीवन जगणे ही जगण्याची दुसरी पध्दत आहे. आपली समाजरचना बदलल्याशिवाय प्रगतीच्या मार्गावर फार थोडाच लाभ होऊ शकेल यात शंका नाही. संरक्षणासाठी किंवा हल्ला करण्यासाठी समाजाला प्रवृत्त केल्या जाऊ शकत नाही. जातीच्या पायावर बांधलेली कोणतीही इमारत उभी करता येत नाही. राष्ट्राची उभारणी करु शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मे १९३६ मध्ये लाहोरच्या जात-पात तोडक मंडळाच्या संमेलनात वाचण्यासाठी तयार केलेला जातिभेद निर्मूलनावरील निबंध संमेलनाच्या संयोजकांनी आडमुठी व मूर्ख भूमिका घेतल्यामुळे वाचता आला नाही. त्यानंतर मात्र तो जातिभेद निर्मूलन या नावाने पुस्तकरुपाने गुजराथी, तामिळ, मराठी, हिंदी, पंजाबी, मल्याळम भाषेत प्रकाशित झाला. या ग्रंथात जातिभेद निर्मूलनाच्या संदर्भात अतिशय महत्वाचे मुद्दे मांडले ते म्हणजे -

१. पोट जाती नष्ट करणे.
२. आंतरजातीयसहभोजनाची योजना
३. आंतरजातीय विवाह
४. धर्मशास्त्राची पवित्रतेची भावना नष्ट करणे

डॉ. आंबेडकरांना जातपाततोडक मंडळासमोरील या भाषणात जातिभेद निर्मूलनात आंतरजातीय विवाह ही बाब मात्र अतिशय समर्थपणे मांडतात. कारण आंतरजातीय विवाह जर मोठया प्रमाणात झाले तर त्यांच्यात रक्तसंबंधाची भावना निर्माण होऊन आपुलकी निर्माण होते व जातिभेदाचा अंत करण्यासाठी हा उपाय भीमबाण असू शकतो.

डॉ. आंबेडकरांना जातपाततोडक मंडळासमोरील या भाषणात जातिभेद निर्मूलनात आंतरजातीय विवाह ही बाब मात्र अतिशय समर्थपणे मांडतात. कारण आंतरजातीय विवाह जर मोठया प्रमाणात झाले तर त्यांच्यात रक्तसंबंधाची भावना निर्माण होऊन आपुलकी निर्माण होते व जातिभेदाचा अंतःकरणासाठी हा उपाय भीमबाण असू शकतो.

डॉ. आंबेडकराला जातिभेद निर्मूलनाच्या संदर्भात ज्या गोष्टी सिध्द करावयाच्या होत्या त्या म्हणजे

१. जातिभेदाने हिंदू समाजाचा नाश केला आहे.
२. चातुर्वर्ण्याच्या आधाराने हिंदू समाजाचे पुर्नसंघटन अशक्य किंवा नाक वाहणाऱ्या

माणसाप्रमाणे आहे. वर्ण मोडून दुसऱ्याच्या वर्णावर अतिक्रमण करणाऱ्यांसाठी कायद्याचे बंधन असल्याशिवाय तिची अधोगती थांबणे अशक्य आहे.

३. हिंदू समाजाचे चार्तुवर्णाच्या आधारे पुर्नसंघटन करणे अपायकारक आहे. कारण सामान्य जनतेला ज्ञान संपादनाचा अधिकार नाकारुन ती त्याची अधोगती करते व शस्त्र धारण करण्याचा अधिकार नाकारुन त्यांना पौरुषहीन करते.

४. हिंदू समाजाचे अशा धर्मतत्वांच्या आधारे पुर्नसंघटन करावयास हवे की, ज्यांचे नाते समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव यांच्याशी जुळू शकेल.

५. हा उद्देश यशस्वी व्हावा म्हणून जातिभेद व वर्ग यांच्या पाठीशी असलेले धर्माचे अधिष्ठान नष्ट केले पाहिजे.

६. जेव्हा शास्त्रांना भगवद्‌वाणी मानण्याचे बंद होईल तेव्हाच जाती आणि वर्ग यांचे धार्मिक अधिष्ठान नष्ट होईल.

डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य अस्पृश्यता व जातिभेद नष्ट करण्यासाठी वेचले हयासाठी त्यांना आपल्या अपत्यांचाही विसर पडला आणि गुलामगिरीच्या बेडयांमध्ये अडकलेला हा संपूर्ण भारतीय समाजाला मानवी मूल्य प्राप्त करुन देणे व त्याची माणूस म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी अविरत संघर्ष केला. त्यांनी हा संघर्ष करतांना ज्या समाजावर हजारो वर्ष अन्याय झाला त्या मृतप्राय समाजाला जागृत करुन स्वाभिमान निर्माण केला, त्यांना संघटित केले आणि अन्यायाविरुध्द लढण्याचे बळ दिले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपली संपूर्ण शक्ती पणाला लावून समाजात अगोदर स्वत्वाची जाणीव निर्माण केली. त्यांचा स्वाभिमान जागृत केला. जातीयतेतून त्याच्यावर लादलेली गलिच्छ दर्जाची कामे सोडून देवून नवे परिवर्तन आणि चैतन्य समाजात निर्माण करणारा नेता डॉ. आंबेडकर होय. या जातीयता आणि अस्पृश्यतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुध्द भारत यासारखी वर्तमानपत्रे काढून समाजमन जागविले, समाजाला योग्य मार्गदर्शन व दिशा दिली. त्यासोबतच अस्पृश्यही माणसेच आहेत. यासाठी चवदार तळयाचा सत्याग्रह नाशिकचा काळाराम मंदीर सत्याग्रह, मनुस्मृती दहन निर्माण करुन प्रस्थापित चार्तुवर्ण्य आणि अस्पृश्यता लादलेल्या ब्राम्हणांच्या व सवर्णांच्या विरोधात बंडाचे निशाण रोवून आपली क्रांती जी समाजाला नव्या प्रकाशाकडे घेवून जाते ती केली आणि अशोक विजयादशमीच्या दिवशी १४ ऑक्टोंबर १९५६ साली बौध्द धम्माची दीक्षा देवून या अस्पृश्यतेमध्ये स्वतःचा आत्मभार, स्वाभिमान, स्वत्वाची जाणीव हरवून बसलेल्या समाजास प्रकाशाचा नवा मार्ग दाखविला.

आज २१ व्या शतकात बाबासाहेब हयात नाहीत परंतू त्यांनी चेतविलेली चेतना आणि भारतीय संविधानाच्या माध्यमातून अस्पृश्यता आणि जातिभेद यांना मूठमाती देवून शक्तिशाली प्रबुध्द भारत निर्माण करण्याच्या दिशेनेच नाही तर विकसनशील देशाकडून थेट महासत्ता बनण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीय घेवून जगत आहे. आज अस्पृश्यता व जातिभेद नष्ट झाला असे खात्रीने म्हणता येत नाही. कारण, भारतीय समाजात दिवसागणिक वाढणारी धर्मांधता कमी होण्याऐवजी वाढत असलेली दिसून येत आहे. राजकीय पक्ष जातीय राजकारण करुन जातिनिष्ठतेला पुष्ठी देत आहे. याचा एकंदरीतच विपरीत परिणाम भारतीय समाजावर पडत असून समाजामध्ये दुही माजविण्याचे कारस्थान करीत आहे असे असतांना सुध्दा आज भारतीय तरुण शिक्षणाच्या माध्यमातून जागरुक झालेला असून जातीयतेच्या बेडया झुगारुन मोठया प्रमाणात आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करुन डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या मार्गाने मार्गक्रमण करीत असून नवशिक्षित तरुणांना प्रबुध्द भारत घडविण्याच्या दृष्टीने आगेकूच करण्यास साहाय्यभूत ठरीत आहे. एकूणच समाजिक चळवळ व परिवर्तन घडून येत असून डॉ. आंबेडकरांच्या विचारांची क्रांतीज्योत तेवत ठेवण्याचे कार्य भारतीय समाज करीत आहे.

बुध्दाचा मानवतावादी धम्मः :-

बुध्द धम्म ही सामाजिक तत्वप्रणाली आहे हे सर्वांना समजल्यानंतर त्याचे पुनरुज्जीवन ही शाश्वत घटना ठरेल कारण सर्वांना आकृष्ट करणारी किंवा प्रभावित करणारी कोणती महानता या धर्मात आहे. तथागत बुध्द हा जगाच्या इतिहासातील पहिला मानवतावादी धम्मप्रवर्तक आहे. मानवतावाद हा बुध्दाच्या तत्वचिंतनाचा, धम्मप्रवर्तनाचा मूळ पाया आहे. जिथे चिंतनाचा केंद्रबिंदू मानव नसेल, मानवकेंद्र धम्म नसेल, तिथे त्याला बौध्द तत्वज्ञान, बौध्द धम्म म्हणताच येणार नाही. बुध्दाने मानवाला स्वतंत्र व संपूर्ण मानलेले आहे. भगवान बुध्दाने म्हटले आहे की मनुष्य हा स्वतःच स्वतःचा स्वामी आहे त्याला दुसरा कोणीही स्वामी नाही. म्हणून त्याने घोषणा केली आहे की, अत्त दिप भव अर्थात स्वयंप्रकाशित व्हा. मानवाला त्याच्या स्वत्वाची ओळख करुन देणारी अशी महान व क्रांतीप्रवर्तक घोषणा बुध्दाशिवाय जगामध्ये त्याकाळी कोणीही केलेली नव्हती. बुध्दाने प्रत्येक मानवाला त्याच्या आंतरिक शक्तीला जागविण्याचे, सचेत करण्याचे आवाहन केले. हेच बुध्दाच्या मानवतावादाचे मुलभूत तत्व आहे. म्हणून प्रत्येक मानवाला त्याच्या सामर्थ्याचे, त्याच्या आंतरिक बळाचे, उर्जेचे ज्ञान करुन दिले पाहिजे, ही धम्म प्रवर्तनामागची बुध्दाची मूळ प्रेरणा आहे. बुध्दाने मानवाच्या कर्तुत्वाला, प्रयत्नशीलतेला, उद्योगशीलतेला, श्रमाला फार महत्व दिले. आपल्या

मानवतावादी विचारामुळेच हा धम्म वंश, भाषा, राष्ट्र, संस्कृतीच्या सीमा ओलांडून संपूर्ण जगामध्ये पसरलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैश्विक, शाश्वत मूल्ये बुध्दाच्या तत्त्वज्ञानातून घेतलेली आहेत आणि बुध्दाचे तत्त्वज्ञान न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता, प्रज्ञा शील, करुणा व मैत्री यावर आधारलेली आहे. सर्व भारतीयांनी जर या तत्त्वांचा अंगीकार स्वतःमध्ये केला व बुध्दाचे तत्वज्ञान समजून घेतले तरच देशाची प्रगती झपाटयाने होऊन विश्वबंधुत्वाची भावना सर्वांमध्ये निर्माण होईल. तसेच बुध्दांचा धम्म हा बुध्दिवादी आहे. बुध्दिप्रामाण्य हा बुध्दांच्या विचारांचा पाया आहे. गौतम बुध्द म्हणतात, तुम्ही कोणत्याही शास्त्राला पवित्र मानू नका. केवळ कोणत्या ग्रंथात लिहिले आहे किंवा मी सांगितले आहे म्हणून ते खरे मानू नका. तुमच्या बुध्दीला व अनुभवाला पटेल तरच ते खरे माना. बुध्दांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे बुध्दांनी स्वतःला इतरांसारखे मोक्षदाता कधीही म्हटले नाही. तर मी मार्गदाता आहे असेच म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रखर बुध्दीनिष्ठ होते. म्हणूनच त्यांनी बौध्द साहित्याचीही कठोर चिकित्सा केली. बुध्दांचे मूळ विचार कोणते व त्यांच्या पश्चात बौध्द साहित्यात कोणत्या विचारांची भेसळ झाली हे शोधून काढण्यात ते अहोरात्र गुंतून गेले व त्यांच्या अनेक वर्षाच्या चिंतन-मनन व चिकित्सेतून जे बुध्द तत्वज्ञान शुध्द स्वरुपात त्यांच्या समोर आले. त्यांचाच त्यांनी स्वीकार केला. बाबासाहेबांनी पूर्ण अवचारांअंती व जाणीवपूर्वक बौध्द धम्माचा स्वीकार केला. व आपल्या लक्षावधी समाजबांधवांना मानवमुक्तीच्या तत्वज्ञानावर उभा असलेला, समताधिष्ठित, मानवी स्वातंत्र्याला पोषक असलेल्या बौध्द धम्माची दीक्षा दिली. संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या, अखिल मानवजातीला दुःखमुक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या गौतम बुध्दांसमोर ते नतमस्तक झालेत. सागरासारख्या अथांग पसरलेल्या बुध्द तत्वज्ञानात सर्वांनाच मुक्तपणे संचार करण्याची मुभा आहे. इथे कुणी लहान नाही, कुणी मोठा नाही, कुणी श्रेष्ठ नाही, कुणी कनिष्ठ नाही आणि भारतीय संस्कृतीचा हा अनमोल ठेवा भारतापुरताच मर्यादित नाही तर संपूर्ण जगात त्याला लौकिक प्राप्त झाला आहे. अशा बौध्द धम्माचा स्वीकार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचा गौरवच वाढविला. ज्या महान बुध्द धम्माचा व तत्वज्ञानाचा भारतात जन्म झाला तो बुध्द धम्म व त्याचे तत्वज्ञान भारतातूनच हद्दपार झाले, असा संदेश जगभर पसरत चालला होता, यापासून बाबासाहेबांनी देशाला वाचविले, देशाची शान राखली. याचा सर्वांनाच अभिमान वाटायला पाहिजे. नागपूरच्या दीक्षाभूमींवरील धम्मदीक्षा सोहळ्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धम्मदीक्षेचे कार्यक्रम पार पडलेत. यामध्ये चंद्रपूर, मुंबई, पूणे, सोलापूर, भुसावळ, माणगांव, अंबरनाथ, खामगांव, खेड, लोणावळा, औरंगाबाद, चिपळून, हवेली, पूर्णा, अचलपूर, तिरोडा इत्यादीचा समावेश आहे. या ठिकाणी लक्षावधी लोकांनी बौध्द धम्माचा स्वीकार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या बौध्द धम्म स्वीकारामुळे भारतीय समाजात एका नवीन स्वाभिमान पिढीचा उदय झाला आहे. जीवनाच्या समृध्दीसाठी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उत्थानाचे भीमपर्व भारतात सुरु झाले आहे. ही एकविसाव्या शतकाला बौध्द धम्माची देण आहे. बौध्द धम्माच्या स्वीकारामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. समाजात त्यांना समानता मिळाल्यामुळे त्यांच्यात स्वाभिमान निर्माण झाला आहे. त्यांना आपल्या जीवनाचे मूल्य कळून चुकले आहे. आपण कुणाचे गुलाम नाही ही भावना त्यांच्यात वाढीला लागली आहे. आपल्या प्रगतीचा मार्ग आपणच शोधला पाहिजे यासाठी ते प्रयत्न करु लागले आहेत. खेडयापाडयातील निरक्षर आई वडिलही माझ्या मुलाने शिकावे, मोठे व्हावे म्हणून धडपडत आहेत.

बौध्द समाजात आज ताठ मान करुन जगणाऱ्यांची पिढी उदयाला आली आहे. ते स्वतःच्या जीवनाचे शिल्पकार बनू पहात आहेत. आजचा बौध्द युवक स्पृश्य हिंदूंना ठणकावून सांगण्यासाठी सज्ज झाला आहे की, आम्ही तुमच्या मते जन्माने अस्पृश्य असलो तरी कर्माने तुमच्याच बरोबरीचे आहोत. ही सर्व किमया बाबासाहेबांच्या धर्मांतराने करुन दाखविली आहे. आज बौध्द समाजाने शून्यातून विश्व निर्माण केले आहे. बौध्द समाजाची पाऊले दर दिवसाला प्रगतीच्या दिशेने धावू लागली आहेत. आजचा बौध्द युवक आकाशाला गवसणी घालू पहात आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात पडत असलेले त्याचे दमदार पाऊल आश्चर्यचकित करणारे आहे. एकेकाळी राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील समस्यांबाबत उदासीन असलेला हा युवक आज कमालीचा जागृत झाला आहे व आपल्यावरील अन्यायाचा सामना करण्याकरिता तो रस्त्यावर उतरुन संघर्ष करु लागला आहे.

आज बौध्द समाजाने शैक्षणिक क्षेत्रात केलेली प्रगती तर प्रस्थापितांची झोप उडविणारी आहे. प्रशासनातील असे कोणते पद आहे की, ज्यावर बौध्द समाजातील माणूस विराजमान झाला नाही. जरी त्यांची संख्या अतिशय कमी असली तरी, पूर्वाश्रमीच्या बहिष्कृत जातीतून शिखरावरील पदावर जावून बसणे, ही काही साधी गोष्ट नाही. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक या पदांवरील बौध्द समाजाची संख्या तर फार मोठी आहे. बौध्द समाजातील महिलाही आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. पुरुषांबरोबरच त्याही सर्व क्षेत्रात अग्रेसर होत आहेत. आजच्या बौध्द समाजात वैज्ञानिक जाणिवाही मोठया प्रमाणात रुजत आहेत. धर्मांतराच्या घोषणेपासूनच या समाजाने आपल्या घरातील देवांना बाहेरचा रस्ता दाखवायला सुरुवात केली होती. आज हा समाज खोटया देवांच्या नादातून मुक्त झाला आहे. एकेकाळी हिंदू धर्मातील ३३ कोटी देवी देवतांना पुजणारा हा समाज आज ज्या प्रमाणात विज्ञाननिष्ठ बनला आहे, ही बाब निश्चितच भूषणावह आहे.

कु. आरती प्रमोदराव जोशी
बी.ए. भाग - २

# बुध्द धम्म :
# सम्यक जीवनाचा मार्ग

प्रस्तावना :-

आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे भौतिकवाद वाढला. भौतिक गोष्टी सहजपणे प्राप्त झाल्यामुळे माणूस आनंदी झाला. तंत्रज्ञानाने माणसाला भौतिक गोष्टी मिळाल्या मात्र त्याबरोबरच माणूसकी व नीतीमूल्याचा ऱ्हास होऊ लागला. प्रत्येक व्यक्तिची आर्थिक गरज हीच महत्वाची झाली, फक्त पैसा मिळवून जास्तीत जास्त भौतिक सुख कशी मिळविता येतील यामागे माणूस धावू लागला. या सर्व परिस्थितीत त्याच्या मागे असमाधान देखील आले.

माणसाला असमाधानासोबत इतरही अनेक आपत्तींना तोंड दयावे लागत आहे जसे भुकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळ, ढगफुटी, भयंकर आजार, युध्द, आतंकवाद इ. अनेक आपत्तीमुळे माणसाचे जगणे दुःखमय झाले. मनुष्याच्या जीवनात असमाधान वाढत गेल्यामुळे त्याची मनःशांती दूर झाली. नैसर्गिक आपत्तींना कोणीही थांबवू शकत नाही. मात्र युध्द, आतंकवाद, जातीयवाद, अंधश्रध्दा, नैतिकतेचे पतन अश्या मानवनिर्मित आपत्तीचे मूळ कारण माणूस स्वतः आहे. माणूस स्वतः असमाधानी असला की त्याची मनःशांती नष्ट होते. तो दुसऱ्याचा द्वेष करु लागतो. दुसऱ्यावर अविश्वास दाखवितो, मोठयांचा अनादर करतो, इतरांना कमी लेखतो, त्याच्या मनावरील ताबा आणि समतोल नष्ट होतो. या सर्व गोष्टी त्याला अशांततेकडे घेवून जातात. बुध्द धर्म हा २५०० वर्षापासून शांतता व अहिंसेचे प्रतिक मानला जातो. विविध देशामध्ये सुरु असलेले युध्द, तसेच बाली, लंडन, न्युयार्क आणि भारतात घडणाऱ्या आतंकवादी घटना यामुळे जागतिक अशांतता निर्माण झाली. ही अशांतता दूर व्हावी यासाठी संपूर्ण जग बुध्द धर्माचे तत्वज्ञान आत्मसात करीत आहेत. अखिल मानव जातीचे कल्याण व्हावे. याविषयी बुध्द तत्वज्ञान उपयोगी ठरते.

अध्ययनाचे उद्देश :-

१. शांती म्हणजे काय ? हे जाणून घेणे.

२. शांतीला प्रभावित करणारे घटक अभ्यासणे.

* बुध्द धर्माचे शांतीविषयक तत्वज्ञान समजून घेणे.

* साहित्याचे अवलोकन :- बुध्द धर्म आणि धम्म याविषयी उपलब्ध साहित्यामधील तत्वज्ञानाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्ष्यात आले की बौध्द धर्म म्हणजे शांतता व अहिंसेचे

प्रतीक होय.

※ संशोधन पध्दती : बुध्द धर्म शांतीचा एक मार्ग हया शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम माहिती संग्रहणाचा उपयोग करण्यात आला.

शांती म्हणजे काय ?

शांती हा शब्द पुढील सर्व शब्दांचा समूह आहे. ज्यामध्ये आनंद, यश, पुर्तता, संयम, स्वातंत्र्य इ. अनेक गोष्टी समाविष्ट आहे. शांती म्हणजेच समाधान. समाधान हे मानवी मनाशी म्हणजेच भावनेशी जोडलेले आहे. प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या बुध्दीने निर्णय घेत असते व त्याप्रमाणे कृती करते. केवळ बुध्दीने विचार करुन निर्णय घेतला तर तो योग्य असेलच असे नाही. बुध्दी पेक्षा मन श्रेष्ठ आहे असे म्हणतात. जर मनाने विचार करुन निर्णय घेतला तर तो योग्य राहू शकतो, कारण मन हे चांगला व वाईट दोन्ही विचार करीत असते. अश्या परिस्थितीत मनाला समाधान लाभले, तर शांती प्रस्थापित होते.

शांतीला प्रभावित करणारे घटक :-

१. व्यक्तिच्या मुलभूत गरजांची पूर्तता :- कोणत्याही व्यक्तिच्या अन्न, वस्त्र, निवारा हया मुलभूत गरजा आहेत. या गरजांची पूर्तता झाली तर व्यक्तिला समाधान मिळते व शांती प्रापत होते.

२. सामाजिक गरजांची पूर्तता :- कोणत्याही व्यक्तिला समाजात राहायला आवडते. किंबहुना दैनंदिन जीवनात त्याचा समाजाशी जास्त संबंध येतो. त्याच्या सभोवताली असणाऱ्या समाजाकडून त्याच्या काही अपेक्षा असतात हया अपेक्षा पूर्ण झाल्या तर त्याला समाधान मिळते व शांती आपोआपच मिळते.

३. मानवी हक्काची पुर्तता :- प्रत्येक व्यक्तिचे मुलभूत अधिकार असतात. त्याला त्याचे अधिकार योग्य वेळेस मिळाले तर त्याला शांती मिळते.

४. सुरक्षिततेची हमी :- कोणतीही व्यक्ती ज्या ठिकाणी तिचे वास्तव्य असते त्या गावात शहरात देशात त्याला स्वतःच्या जीविताची सुरक्षितता प्राप्त झाली तर त्याला शांती मिळते.

५. नैसकि आपत्ती :- माणसाची शांती नैसिर्गक घटकांवर देखील अवलंबून असते. अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळ, ढगफूटी, भूकंप अश्या नैसग्रिक आपत्तीमुळे व्यक्तिच्या शांततेचा भंग होतो. निसर्गाची कृपा असेल तर शांती मिळते.

बुध्द धर्माचे तत्वज्ञान :-

बुध्द धर्माची संपूर्ण बैठक ही मनाच्या अभ्यासावर आहे. मनःशुध्दी किंवा चित्तशुध्दी हा धर्माचा केंद्रबिंदु होय. बुध्दाचा धम्म म्हणजेच शांतीचा मार्ग. एखाद्या व्यक्तिला चांगली व्यक्ती

म्हणून जगायचे असेल, कुशल कार्य करावयाचे असेल, तर त्याने जीवन जगण्याच्या काही तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. ही तत्वे म्हणजेच शांतीचा मार्ग होय.

या भूतलावर जगणाऱ्या कोणत्याही जिविताला मग तो प्राणी, पशु, वनस्पती, किटक अश्या कोणत्याही स्वरुपात असला तरी त्याला दुखवू नये, त्याची हत्या करु नये. आपल्या सभोवताली असणाऱ्या कोणत्याही व्यक्तिशी खोटे बोलू नये. वाईट वर्तन करु नये. व्यसन करु नये. कोणत्याही व्यक्तिला, बुध्द धर्मात सांगितलेल्या अष्टांगमार्गानुसार, प्रवास करावयाचा असेल तर त्या व्यक्तिने सम्यक मार्गाची निवड करावी त्यापासून विचलित होऊ नये. पथ अनेक आहेत पण सर्वच सम्यक मार्गाकडे नेत नाहीत. सम्यक मार्ग हा सुखाचा मार्ग आहे हा काही लोकांसाठी सुखाचा मार्ग नाही तर हा सवार्ङ्गंसाठी सुखाचा मार्ग आहे. हा मार्ग आदी, मध्य व अंती कल्याणाचा आहे. सम्मक मार्गाचे अनुसरण म्हणजे बुध्द जीवन मार्गाचे अनुसरण होय. अष्टांगिक मार्ग हा श्रेष्ठतम मार्ग आहे. प्रज्ञेच्या विशुध्दीचा हाच एकमेव मार्ग आहे.

या मार्गाने मार्गक्रमण केल्यास दुःखाचा क्षय होईल. जो संयम वाणी आहे, जो संयम चित्त आहे आणि जो कायेने कोणतेही अकुशल कर्म करीत नाही असा माणूस प्रज्ञावंतांनी पुरस्कारलेल्या मार्गावर मार्गक्रमण करतो व सुख प्राप्त करतो.

सम्मा दित्ती :-

अष्टांगमार्गाचे पहिले तत्व सम्मा दित्ती होय. या तत्वानुसार मनुष्याचे अज्ञान दुर होते. त्याला कुशल व अकुशल कार्यातील फरक लक्षात येतो. जणू काही संपूर्ण जग हे काळोखाने भरलेले कारागृह आहे. माणूस या कारागृहातील बंदिस्त आहे. या बंदिस्त माणसाला आपण बंदिस्त असल्याची जाणीव होत नाही. अश्या वेळी सम्मा दित्ती या बंदिस्ताला स्वातंत्र्य देते. माणसाला चांगले व वाईट किंवा कुशल व अकुशल या मधील फरकाचे ज्ञान होते. मनाला शांती मिळविण्यासाठी सम्मा दित्तीच्या साहयाने तो स्वतःला अडचणीतुन वाचू शकतो. सम्मा दित्ती म्हणजे इच्छाशक्ती, समजा, ज्यामुळे माणसाला योग्य विचार करुन इच्छा शक्तीच्या साहयाने खऱ्या खोटया गोष्टीतील फरक लक्षात येतो. मनाला शांती मिळविण्यासाठी सम्मा दित्तीच्या साहयाने तो स्वतःला अडचणीतून वाचवू शकतो.

सम्मा सनकाप्पो :-

अष्टांग मार्गाचे हे दुसरे तत्व होय. या तत्वानुसार माणसाने महत्वाकांक्षी असावे, जीवनाचे ध्येय निश्चित करावे मात्र ते पूर्ण करण्याकरिता कोणत्याही गैर मार्गाचा उपयोग करु नये. कोणत्याही उद्देश योग्य असावा.

सम्मा वक्का :-

अष्टांगमार्गाचे तिसरे तत्व सम्मा वक्का या तत्वामध्ये अशी शिकवण दिली आहे की, प्रत्येकाने फक्त खरे बोलावे, काय खोटे आहे याबद्दलही बोलू नये, दुसऱ्याच्या चुका, दुर्गूणाविषयी बोलू नये, कोणत्याही व्यक्तिला रागावून किंवा अपशब्दाने बोलू नये, सर्वांशी प्रेमाने व आदराने बोलावे, दुसऱ्याचे मन दुखविले जाईल असे बोलू नये. नेहमी योग्य भाषेत बोलावे. जेणे करुन आपले दुसऱ्याशी नाते चांगले राहील व दुःख, क्लेष या गोष्टी दूर होतील.

सम्मा कमानतो :-

अष्टांगमार्गाचे चवथे तत्व सम्मा कमानतो या तत्त्वानुसार प्रत्येकाने आपली वागणूक, दुसऱ्या सोबतची आपली कृती चांगली ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत आपल्या वागण्यामुळे दुसऱ्याचा अपमान होईल किंवा अनादर होईल असे वागू नये.

सम्मा अजिवो :-

अष्टांगमार्गाचे पाचवे तत्व सम्मा अजिवो दैनंदिन जीवनात आपण जी मिळकत प्राप्त करतो, ती प्राप्त करण्याचे दोन मार्ग आहेत एक चांगला मार्ग व दुसरा वाईट मार्ग होय. चांगला मार्ग म्हणजे, ज्या मार्गात दुसऱ्यावर अन्याय किंवा इजा होणार नाही असा मार्ग होय. वाईट मार्गात दुसऱ्यावर अन्याय किंवा इजा होईल असा मार्ग होय. सदैव चांगल्या मार्गाचा उपयोग करावा. ज्यामुळे शांती प्राप्त होते.

सम्मा व्यायामो :-

अष्टांगमार्गाचे सहावे तत्व सम्मा व्यायामो या तत्वानुसार माणसाला सत्य समजण्यात अपयश येते. त्यामुळे दुःखाचे कारण समजू शकत नाही आणि दुःख दूर होऊ शकत नाही. चांगल्या गोष्टी केल्या तर मनाचा विकास होतो. अडचणींचे निराकरण होते व जीवन सफल होते.

सम्मा सत्ती :-

अष्टांगमार्गाचे सातवे तत्व सम्मा सत्ती या तत्वानुसार माणसाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा, जेणेकरुन त्याच्या मनातील वाईट विचारांवर त्याला विजय मिळविता येईल.

सम्मा समाधी :-

अष्टांगमार्गाचे आठवे तत्व सम्मा समाधी समाधी म्हणजे ध्यान होय. ध्यानामुळे माणूस चांगल्या गोष्टी, चांगले विचार करतो, वाईट विचारांपासून त्याला दूर राहाता येते. चांगल्या गोष्टींचा विचार करण्याचीच सवय लागते.

अवलोकन :-

आजच्या काळात मनुष्याला सर्व सुखे मिळाली, यश मिळावे स्वातंत्र मिळाले, तरीही

समाधान कुठेतरी हरविलेले दिसून येते जे समाधान व आनंद स्वतःजवळ असूनही माणसाला मिळविता येत नाही. कारण ज्या मनामध्ये हे समाधान व आनंद असतो ते जाणून घेण्याचे ज्ञान माणसाला नाही.

मनुष्याला सहज मिळणाऱ्या सुखामुळे त्यांचा अहंकार वाढला. अहंकारासोबत द्वेष मोह वाढला. कौटुंबिक कलह जातीयवाद, सामाजिक जबाबदारीचा ऱ्हास होऊ लागला. स्वतःच्या स्वार्थाकरिता लोक एकमेकांशी भांडण करु लागले, आतंकवाद वाढला, युध्दाशिवाय दुसरे पर्याय नष्ट झाले. सर्वत्र अशांती पसरलेली दिसून येते.

मन किंवा चित्त हे नेमीचे शुध्द असते. मात्र सभोवतालच्या परिस्थितीमुळे किंवा वाईट विचारांच्या अंतर्भावामुळे मन कलुषित होते. द्वेष, मत्सर, राग, लोभ, काम, मोह इ. वाईट प्रवृत्तीमुळे शुध्द मनाला विकार जडतात. मन दुषीत होते. अश्या कलुषित मनाच्या लोकांची संख्या वाढली तर संपूर्ण समाजाला किड लागते. त्याचा परिणाम संपूर्ण राष्ट्रावर होतो. परिणामतः जागतिक पातळीवर देखील नैतिकतेचा ऱ्हास झालेला दिसून येतो.

बुध्द धर्मात असेही सांगितले आहे की ज्या चांगल्या वा वाईट प्रवृत्तींनी मन जबाबदार मानले जाते, त्या मनावर ताबा मिळावा. या धर्मात विपशनेला महत्व दिले आहे. विपशना म्हणजे ध्यान ध्यानाच्या माध्यमातून मनावर इंदियांवर नियंत्रण कसे मिळवावे हे धर्मात सांगितले आहे. वाईट प्रवृत्तीपासून दूर राहावयाचे असेल तर केवळ कर्मकांड, जप, तप करुन चालणार नाही तर स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवता येणे गरजेचे आहे असेही त्या धर्मात सांगितले आहे.

ज्यावेळी व्यक्तिचे स्वतःच्या मनावर नियंत्रण प्रस्थापित होईल. त्यावेळी काय चांगले, काय वाईट याची जाणीव त्याला होईल.

आजच्या काळात संपत्ती यश, स्वातंज्य इ. गोष्टी आनंदाने व समाधानाचे प्रमुख स्त्रोत मानल्या जातात. मात्र खऱ्या अर्थाने ही सुखाची किंवा समाधानाची साधने नव्हेत. सुखाचे समाधानाचे मुख्य साधन मानवी होय. मनुष्याने या गोष्टीवर विश्वास ठेवला तर त्याला जास्तीत जास्त समाधान मिळेल. तुमचा आनंद टिकवावयाचा असेल तर ध्यान करुन चित्तशुध्दी करावी अशी हया धर्माची शिकवण आहे.

कु. प्रगती लालसिंग पाल
बी.ए. भाग - २

# उच्च शिक्षणासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दूरदर्शी विचार विश्व

प्रस्तावना :-

एकोणिसाव्या व विसाच्या शतकात भारताला परिवर्तनाची दृष्टी देणारे, प्रबोधनाचे नवे तत्वज्ञान देणारे जे थोडे विचारवंत झाले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने येते. त्यांनी मानवी जीवनाच्या विविध अंगांचा विचार केला. मानव ज्या परिस्थितीत जीवन जगत आहे त्या परिस्थितीचा अभ्यास केला. भारतात वर्षानुवर्षापासून मुळ धरुन असलेली सामाजिक विषमता, अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, पितृसत्ताक पध्दतीच्या नावाखाली केले जाणारे अत्याचार, अस्पृश्यता, शिक्षणाचा अभाव, धर्माच्या नावाखाली केले जाणारे अत्याचार या गोष्टींनी ते अस्वस्थ झाले. यातून मुक्त व्हायचे असल्यास शिक्षणाचा त्यावर उपाय आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. आपल्या एका लेखात ते म्हणतात - शिक्षण म्हणजे व्यक्तिचा मानसिक व बौध्दिक विकास करुन आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शस्त्र आहे. अर्थातच डॉ. आंबेडकरांनी मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाच्या सर्व स्तरातील लोकांसाठी शिक्षण आवश्यक मानले. डॉ. आंबेडकरांनी केवळ शिक्षण विषयकच विचार मांडले नाही तर शिक्षणाच्या प्रसारासाठी भरीव कार्य केले. प्रस्तुत लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

शिक्षणाच्या संदर्भात भारतातील तत्कालीन परिस्थिती :-

कोणत्याही महापुरुषाचया जडणघडणीत परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक आणि प्रत्यक्ष लढयाची पार्श्वभुमी बघतांना समकालीन परिस्थितीचा आढावा घेणे महत्वाचे आहे. तो काळ म्हण्जो समिश्र घटनांनी व्यापलेला कालखंड होय. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांती घडून आलेली होती. वैज्ञानिक अविष्कारामुळे जग झपाटयाने बदलत चालले होते. विकास आणि समृध्दीच्या नवीन वाटा निर्माण होत होत्या. परंतु याउलट परिस्थिती भारतीय उपखंडात होती. पेशवाई संपुष्टात आली होती. सामाजिक अवनतीचा तो काळ होता. या कालखंडाच्या खाणाखुणा स्पष्टपणे आंबेडकरकालीन परिस्थितीत जाणवत होत्या. जातीभेद, वर्णभेद, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, धर्माच्या नावाखाली अत्याचार, शिक्षणाचा अभाव अशी स्थिती होती.

हजारो वर्षापाासून भारतात प्राचीन काळात सुरु झालेलीच परंपरागत शिक्षण पध्दती एकोणिसाव्या शतकापर्यंत सुरु होती. शतकानुशतकापासून शिक्षण घेण्याचा अधिकार विशिष्ट वर्णाच्या लोकांना देण्यात आलेला होता. त्यांनीच शिक्षण घ्यायचे व द्यायचे हे निश्चित करण्यात आलेले होते, बहुजन समाज मात्र शिक्षणापासुन वंचित होतो. अनेक वर्षापासून शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजाच्या मनात आम्हाला काय शिकून ब्राम्हण व्हायचे आहे ही भावना निर्माण झाली होती.

कुटुंबातलया मुलांना शिक्षण दयायचे म्हटले तर तो लहानपणीच काम करायला लागलेला असल्याने, येणारे पैसे बंद होणार होते उलट त्यालाच शिक्षणासाठी पैसा पुरवावा लागणार होता. अश्या परिस्थिती मुलांच्या शिक्षणावर पैसा खर्च केला पाहिजे असे बहुजन समाजाला वाटत नव्हते. परिणामी सामाजिक विषमतेसोबतच आर्थिक विषमता ही वाढलेली होती. डॉ. आंबेडकरांना सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी एक महत्वपूर्ण मार्ग वाटत होता तो म्हणजे शिक्षण.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या प्रश्नाकडे राष्ट्रीय दृष्टिकोणातून बघितले. राष्ट्राचा विकास, शिक्षणाच्या संधी देशातील सर्व समाज घटकांना प्राप्त झाल्याशिवाय अशक्य आहे असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षण प्रसारात प्राथमिक शिक्षणही अत्यंत महत्वाचे आहे असे त्यांना वाटत होतेच सोबतच ते उच्च शिक्षणापर्यंत गेले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, सी.ना. शिवतकर यांनी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात विचार मांडले परंतु डॉ. आंबेडकरांनी याबाबत केवळ विचारच मांडले नाही तर प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत ते फार आग्रही होते. तसेच ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही त्यांना सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे असे त्यांना वाटत होते. एवढेच नाही तर शिक्षण हे केवळ पुरुष वर्गासाठीच नाही तर महिला वर्गासाठीही अत्यंत आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. उच्च शिक्षणाचा समाजाच्या सर्व स्तरातून प्रसार झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. याबाबत त्यांनी केवळ विचार मांडले नाही तर त्या दृष्टिने कार्य केले.

**शैक्षणिक क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान :-**

शिक्षण आणि समाजहित यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे पारंपारिक शिक्षण पध्दती व पारंपारिक शिक्षक डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. ब्राम्हण वर्गाच्या हातातील शिक्षण आधुनिक तत्वाशी विरोधाभासी असल्याने ते त्यांनी नाकारले आणि शिक्षण क्षेत्रात विकेन्द्रीकरण असावे यावर भर दिला एवढेच नाही तर भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट करण्यापूर्वी व त्यानंतरचा भारत सरकारचा देशव्यापी अस्पृश्यतेचे उच्चटन करणारा १९५५ चा एकच कायदा

होण्यापूर्वी प्रत्येक प्रांतात राज्यात अस्पृश्यता निवारक कायदे होते अर्थात प्रत्येक प्रांताचा कायद्यातील सर्व प्रांतातील या कायद्याचे स्वरुप मात्र अस्पृश्यता नष्ट करण्याचेच होते. शिक्षणाच्या संदर्भात, राज्याकडून प्रतिपादित अथवा राज्य निधीतून साहय मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा यांच्या अथवा यापैकी कोणत्याही आधारावर प्रवेश नाकारला जाणार नव्हता. अर्थातच भारताच्या राज्यघटना निर्मितीत व कायदे निर्मितीत डॉ. आंबेडकरांचे मोठे योगदान होते. बहिष्कृत भारताच्या पहिल्या अंकात दि. ३/४/१९२७ आजकालचे प्रश्न या सदरात त्यांनी लिहिले होते, विद्यार्थ्यांनी एकत्र भोजन घेण्यावर केवळ ब्राम्हणच नाही तर काही ब्राम्हणेतर इतर ब्राम्हणेतरांना विरोध करत असत एकंदर अशी स्थिती होती. जिथे जिथे डॉ. आंबेडकरांच्या जीवनात असे प्रसंग आलेत तिथे तिथे त्यांनी त्याचा विरोध केला.

समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे ठाम मत असल्यामुळे शेक्षणिक क्षेत्र शासनाच्या ताब्यात असावे असे त्यांना वाटत होते. जेव्हा १९२० च्या कायद्यानुसार मुंबई शहरातील व जिल्हयातील शिक्षणाची जबाबदारी जेव्हा स्थानिक नगरपालिका व लोकल बोर्डाकडे सोपविण्यात आली ते डॉ. आंबेडकरांना आवडले नाही कारण यामुळे शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार व हुकुमशाही निर्माण होईल व त्याचे दुष्पपरिणाम अस्पृश्यांना भोगावे लागतील असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. अश्या स्थितीत देशाचा विकास अशक्य असल्याने राष्ट्रीय दृष्टीकोनातून ही जबाबदारी शासनाची असावी असे मत त्यांनी आग्रहाने मांडले होते.

उच्च शिक्षण देणारी जी महाविद्यालये होती त्यांनी त्या काळात विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या फी ची रक्कम खुप जास्त केलेली होती. जे डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. भरमसाठ फी वाढीमुळे दलित वर्गातील लोक जे मूळातच आर्थिक दृष्टया दुर्बल आहे ते उच्च शिक्षण घेवून शकणार नव्हते व उच्च शिक्षणाच्या अभावामुळे समाजात असलेली आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट न होता वाढत जाणार होती. डॉ. आंबेडकरांना यावर काही उपाययोजना केल्या गेल्या पाहिजे असे वाटत होते. त्यांना याबाबत जेव्हा उपाययोजना करण्याची संधी मिळाली ती त्यांनी गमाविली नाही.

जेव्हा मुंबई सरकार तर्फे डॉ. पी.जी. सोलंकीच्या प्रस्तावानुसार अस्पृश्य आणि आदिवासींच्या शैक्षणिक आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करण्यास ओ.बी.एच. स्टार्ट ए.व्ही समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीचे सदस्य डॉ. आंबेडकर आणि इ.बी. ठक्कर हे होते. १९३० मध्ये समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला तेव्हा त्यात डॉ.

आंबेडकरांनी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शहराच्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी सुध्दा शिष्यवृत्ती देण्याची शिफारस केली एवढेच नाही तर अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारचीच असली पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

मानवी जीवनाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात शिक्षणामुळे परिवर्तनाची प्रक्रिया सुरु होते. शिक्षणामुळे समाजात नवी मूल्ये, नव्या जाणिवा निर्माण होउन सुधारीत समाज घडविण्याची शक्ती शिक्षणामध्ये असते. शिक्षणामुळे माणसाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते व जर हे शिक्षण मानवाला मिळाले नाही तर गुलामगिरी सारख्या गोष्टींना त्याला तोंड दयावे लागत होते. डॉ. आंबेडकरांनी भारतात वर्षानुवर्षापासून चालत आलेल्या सामाजिक गुलामगिरीला संपविण्यासाठी शिक्षण क्षेत्रापासून आपल्या क्रांतीकार्याला सुरुवात केली.

डॉ. आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. संस्थेच्या स्थापनेचा उद्देशच मूळी पूर्ण देशभरात दलित समाजात जास्तीत जास्त शिक्षणाचा प्रसार करणे. संस्थेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी बहुजन समाजामध्ये शिकण्याची जिद्द निर्माण केली. त्यांनी सिध्दार्थ कॉलेज, मिलींद कॉलेज तसेच मुंबई कऱ्हाड, औरंगाबाद, नागपूर, ब्रम्हपूरी, चंद्रपूर इत्यादी ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाने असलेली महाविद्यालये अशी उच्च शिक्षणाची केंद्र सुरु केली.

अस्पृश्य समाजाची जी तत्कालीन स्थिती होती ती जर दूर करावयाची असेल तर आधी उच्च शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. ते म्हणत असत एक मुलगा बी.ए. झाल्याने अस्पृश्य समाजास जो आधार होईल तसा एक हजार मुले चौथी शिकून पास झाले तरी होणार नाही म्हणून ते उच्च शिक्षणाच्या बाबतीतही फार आग्रही होते.

अस्पृश्य समाजातील जास्तीत जास्त संख्येने मुलांनी उच्च शिक्षण घ्यावे, प्रशासनात उच्च पदे प्राप्त करावी व शासनकर्ती जमात बनून समाजाची प्रगती करण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांना वाटत होते. स्वतः डॉ. आंबेडकरांनी एक विशेष कार्यक्रम हाती घेतला होता तो म्हणजे उच्च शिक्षणासठी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना परदेशी प ाठविण्यासाठी सहाय्य केले. इ.स. १९४५ मध्ये त्यांनी उच्च शिक्षण घेण्यासाठी वीस विद्यार्थ्यांना अमेरिका व इंग्लंड येथे पाइविले. परिणामी बहुजन समाजाला शिक्षणाच्या समान संधी प्राप्त होऊ लागल्या.

डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणात सहशिक्षणाचा पुरस्कार केला. सहशिक्षण म्हणजे स्त्रियांची पुरुषांच्या बरोबरीने एकत्र येऊन घेतलेले शिक्षण. मात्र हे पुराणमतवाद्यांना मान्य नव्हते. त्यांनी स्त्री पुरुष एकत्र आले तर नैतिकतेला धोका निर्माण होईल असे विचार रुढ केलेले होते.

अर्थातच यामागे स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा पुराणमतवाद्याचा दृष्टिकोन डॉ. आंबेडकरांनी ओळखून त्यांनी सहशिक्षणावर भर दिला.

पिपल्स सोसायटीने औरंगाबाद येथे जे महाविद्यालय सुरु केले होते तिथे मुलांसोबत मुली सुध्दा शिक्षण घेत होत्या. महाविद्यालयातून दूर राहणाऱ्या मुली केवळ दूर राहत असल्यामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून महाविद्यालयातर्फे एका बसची व्यवस्था करण्यात आली होती. महाविद्यालयात सर्व जाती धर्माचे मुले व मुली एकत्र शिक्षण घेत होते एवढेच नाही तर तेथील प्राध्यापक वर्गात सर्व जाती, धर्माचे लोक होते. महाविद्यालयात प्रामुख्याने अस्पृश्य आणि इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यात यावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी आग्रह धरला होता.

उच्च शिक्षणाच्या संदर्भात आंबेडकरांना विद्यार्थी ज्या विद्यापीठात शिक्षण घेतात त्याच्या कारभाराकडेही विद्यार्थ्यांना लक्ष घातले पाहिजे असे वाटत होते. कारण विद्यार्थ्यांनी शिकावे हे विद्यापीठ जरी ठरवित असले तरी आपल्या बौध्दिक विकासाला आपण शिकतो तो खरोखरच पोषक व आवश्यक आहे की नाही हे प्रत्येक विद्यार्थ्याने पाहिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. कारण उच्च शिक्षणाच्या काळात विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी होत असते तो आदर्श नागरिक होणार किंवा नाही हे शिक्षणक्रम त्याला मिळणारे वातावरणच ठरविणार असल्यामुळे विद्यापीठाची उच्च शिक्षणाची ध्येय धोरणे विद्यार्थ्यांनी लक्ष्यपूर्वक बघितली पाहिजे असे त्यांचे मत होते.

विद्यापीठाच्या सिनेट मध्ये असणारे सदस्य उच्च शिक्षण संदर्भात स्वार्थाने प्रेरीत होउन निर्णय घेत असल्यास विद्यार्थ्यांनी त्याचा विरोध केला पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. उच्च शिक्षणामुळे विद्यार्थी व प्राध्यापक यांची शैक्षणिक गुणवत्ता तर वाढेलच परंतू यासोबतच त्यांनी आपल्यामध्ये उच्च नैतिक मूल्ये सुध्दा जोपासण्याचा प्रयत्न केला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता एवढेच न ाही तर प्राध्यापक वर्गाने आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत राहील व सर्वांची प्रगती होऊ शकेल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. एकंदरीत डॉ. बाबासाहेब यांनी शैक्षणिक क्षेत्रासंबंधी मौलिक विचार मांडून आजीवन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले.

कु. समिक्षा रं. कुंभरे
बी.ए. भाग - २

# हिंदुधर्माच्या तत्वज्ञानाचे मूल्यांकन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय आणि उपयुक्तता या दोन कसोटयाच्या आधारे हिंदूधर्माच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक परीक्षण केले. न्यायाच्या कसोटीनुसार परीक्षण न्यायाच्या कसोटीत समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वांचा समावेश होतो. याचा अर्थ न्याय म्हणे समता, स्वातंत्र्य आणि बंधुता होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, हिंदू धर्मात समता नाही. हिंदू धर्मात चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि जातिव्यवस्था आहे. समाजाचे विभाजन चार वर्ण आणि विविध जातीत करण्यात आले. भिन्न भिन्न जातीचा स्तर सारखा नाही. प्रत्येक जात ही वेगवेगळी असून एकापेक्षा दुसरी वरचढ आहे. हिंदू धर्मात केवळ सामाजिक विषमता आधारित आहे.

स्वातंत्र्यासाठी समता, आर्थिक सुरक्षितता आणि शिक्षण घेण्याचा हक्क या तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. परंतु हिंदू धर्मात व्यवसाय निवडीला स्वातंत्र्य नाही. आर्थिक स्वातंत्र्य नाही. शूद्राची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही. स्वातंत्र्यास ज्या गोष्टींची आवश्यकता असते, त्यास हिंदू धर्माचा विरोध आहे. त्यामुळे हिंदू धर्माने स्वातंत्र्याचे तत्व नाकारले आहे.

व्यक्तिवादाच्या विरुध्द बंधुभाव आहे. बंधुभावाचे दुसरे नाव म्हणजे आपलेपणाची भावना होय. या भावनेतून दुसऱ्यांच्या चांगुलपणाची कल्पना येते, ओळख पटते. ज्यामुळे दुसऱ्याचे हित हे स्वाभाविकपणे त्याचे हित बनते. बंधुभावामुळे दुसरी व्यक्ती आपली प्रतिस्पर्धी आहे असा विचार त्यांच्या मनात येऊ शकत नाही. हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेमुळे एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांना आपले शत्रू वाटतात. अस्पृश्यांच्या संदर्भात तर हिंदुच्या मनात तिरस्काराची भावना आहे. त्यामुळे हिंदू धर्मात बंधुभावाचा अभाव आहे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्यायाच्या कसोटीवर हिंदू धर्माचे मूल्यांकन केल्यानंतर ते असा निष्कर्ष मांडतात की हिंदू धर्म हा समतेचा द्वेष करणारा धर्म आहे.

उपयुक्ततेच्या कसोटीनुसार परीक्षण

व्यक्तीच्या दृष्टीने जे अन्यायी असेल ते समाजाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकत नाही. जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्यव्यवस्था यावर हिंदूधर्म आधारित आहे. अनेक हिंदू जातीव्यवस्थेची फार उपयुक्तता असल्याचा दावा करतात आणि अशी वर्णव्यवस्था विचारपूर्वक तयार केल्याबद्दल व त्यास दैवी अनुमती मिळविल्याबद्दल मनुची मुक्तकंठाने स्तुती करतात. म्हणून डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्था आणि चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून परीक्षण केले.

जातिव्यवस्थेने माणसाला निर्जीव केले आहे. ही एक निर्बिजीकरणाचीच प्रक्रिया म्हणावी लागेल. स्वतंत्र आणि माणूसपदाला पोहोचण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, संपत्ती आणि श्रम यांची आवश्यकता आहे. संपत्ती आणि श्रम यांच्याशिवाय केवळ शिक्षण हे निरुपयोगी आहे. शिक्षण आणि श्रम यांच्याशिवाय असलेली संपत्ती कैफ आणते. माणसाची वाढ आणि विकासाकरिता या तिन्ही गोष्टी आवश्यक आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात.

भारतात सामाजिक क्रांती होऊ शकली नाही, याचे प्रमुख कारण म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था होय. यामुळे हिंदू धर्मातील खालच्या स्तरावरील समाज हा प्रत्यक्ष कृती करण्याच्या दृष्टीने अपंग बनला आहे. तो शस्त्रे बाळगू शकला नाही आणि शस्त्राशिवाय तो विद्रोह करु शकला नाही हे स्पष्ट करुन डॉ. आंबेडकर म्हणतात की हिंदू धर्माचे तत्वज्ञान सामाजिक उपयुक्ततेच्या कसोटीत उतरत नाही.

उपयुक्तता आणि न्यायाच्या कसोटीवर हिंदू धर्माचे तत्वज्ञान का उतरत नाही याचे कारण स्पष्ट करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की हिंदूच्या धार्मिक आदर्श आणि दैवी प्रशासनाने आदर्श अशा वर्गाची निर्मिती केली. तो स्वतःच एक स्वतंत्र वर्ग आहे. त्यात व्यक्ती किंवा समाज हा केंद्रस्थानी नसतो. केंद्रस्थानी असतो तो फक्त एक वर्ग आणि तो वर्ग म्हणजे श्रेष्ठ माणसांचा ब्राम्हणाचा वर्ग. जो कोणी सर्वस्व संपादन करणाऱ्या व विध्वंस करणाऱ्या घटकांचा विचार करेल त्याला कळून येईल की हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान हे उपयुक्तता आणि न्याय या दोन घटकांवर अधिष्ठीत नाही. जी गोष्ट केवळ ब्राम्हण वर्गाच्या हिताची गोष्ट असेल तीच योग्य व चांगली असल्याची मान्यता हिंदू धर्माने दिली. सर्वसामान्य माणसाचे हिंदुधर्मात सोयरसुतक नाही.

हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक विश्लेषण केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा निष्कर्ष मांडतात की हिंदू धर्माच्या तत्वज्ञानास मानवतेचा धर्म असे म्हणता येणार नाही.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी कोणत्याही धर्माची किंवा धर्माच्या तत्वज्ञानाचे परीक्षण करण्यासाठी न्याय आणि उपयुक्तता या दोन कसोटया सांगितल्या आहेत. या दोन्ही कसोटयांच्या आधारावर हिंदू धर्माचे मूल्यांकन करुन त्यांनी असा निष्कर्ष काढला की हिंदू धर्म हा न्याय व उपयुक्ततेच्या कसोटयांवर खरा उतरत नाही.

बुध्दधम्माचे मूल्यांकन :–

धर्माच्या तत्वज्ञानाच्या न्याय आणि उपयुक्तता या कसोटीवर जो धर्म खरा उतरत नाही तो धर्म मानवाच्या कल्याणाचा, मानवतेचा असूच शकत नाही. या कसोटीवर उतरणारा धर्म आम्हाला हवा. त्यासाठी धर्मांतराशिवाय पर्याय नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

सागितले.

बुध्दधम्माची त्यांनी धर्माच्या किंवा धार्मिक तत्वज्ञानाच्या न्याय, उपयुक्तता या कसोटयांच्या आधारावर चिकित्सा केली. तेव्हा त्यांच्या या कसोटयांनुसार बुध्दधम्म खरा उतरला. बुध्दधम्म हा वास्तववादी धम्म आहे. काल्पनिक गोष्टीवर बुध्दाने आपल्या धम्माची उभारणी केलेली नाही. म्हणून ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म इत्यादी गोष्टी बुध्दाला मान्य नव्हत्या. बुध्दधम्माचा मुख्य उद्देश मानवाचे कल्याण करणे हा आहे कारण नीती म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीती होय.

तथागत बुध्दांनी सर्व प्रकारच्या मानसिक, आंतरिक दुःख नष्ट करणारा धम्म दिला. तथागत बुध्द म्हणतात. सर्व प्रकारच्या दुःखाच्या नाशासाठी पावित्र्याचे जीवन जगा तथागत बुध्दांनी बुध्दी, धम्मज्ञान व संघ अशी तीन धरणे अर्थात मूर्तीमंत अनमोल रत्ने दिली. जगाच्या शांततेसाठी व समतेसाठी पंचशील दिले. उत्कृष्ट मार्ग दिला. मानवी हिताला पोषक व तारक ठरणारे दहा परमोच्च गुण म्हणजेच दहा पारमिता दिल्यात.

अशाप्रकारे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या तत्वावर आधारित असलेली न्यायाची कसोटी आणि समाजाच्या उपयुक्ततेची कसोटी या दोन्ही कसोटयांच्या आधारावर बुध्दधम्म खरा उतरतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दधम्माचा स्वीकार केला. वैश्विक मूल्ये जपणारा, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी असा बुध्दधम्माचा स्वीकार केला.

धम्माचा केंद्रबिंदू माणूस व नीतिमत्ता आहे नीतिमत्तेचा नीट विकास झाल्याशिवाय माणूस सृजनशील बनल्याशिवाय सृजनात्मक समाजाची वा राष्ट्राची निर्मिती होऊ शकत नाही. भारत बौध्दमय करीन या बाबासाहेबांच्या घोषणेतील मर्म नेमके हेच आहे. त्यांना सृजनशील भारताची निर्मिती अभिप्रेत होती आणि त्यांना जेव्हा अभ्यासाअंती हे दिसून आले की धर्म व्यवस्थेतील ईश्वर व आत्मा संकल्पनेमुळे माणसातील सृजनशीलतेचा विकास अडखळतो. तेव्हा त्यांनी ईश्वर व आत्मा संकल्पना नाकारणाऱ्या आणि माणूस व नीतिमत्ता मान्य असलेल्या धम्माचा स्वीकार केला. कारण समाज वा राष्ट्र बनते ते कठोर माणसातूनच माणसांमुळे बनणाऱ्या समाज वा राष्ट्राला सृजनशील बनविण्यासाठी माणसामधील नीतिमत्तेचा संवर्धनाची गरज असते. हे संवर्धनही प्रत्यक्ष व्हावे लागते. कशाची भीती दाखवून केले गेले तर भीतीचे माध्यम मोठे होते. त्या माध्यमामुळे माणूस दुर्लक्षित होतो.

माणसातील नीतिमत्तेच्या विकासासाठी धम्माने ईश्वराची व आत्म्याची भीती दाखविली. परिणामी ईश्वर व आत्मा मोठा झाला. धम्म विचाराने ईश्वर व आत्मा नाकारला आणि सरळ सरळ माणूस आणि त्यांच्यातील मानवीयतेला हात घातला. परिणामी मध्यस्थच उरला नाही. सृजनशीलतेचा विचार ज्याला त्याची गरज आहे. सरळ त्याच्यापर्यंत पोहचविण्याची भूमिका धम्माने स्वीकारली. म्हणून धम्माचा केंद्रबिंदू माणूस व नीतिमत्ता आहे. माणसाचा आत्मविश्वास जोपर्यंत बळकट होत नाही तोपर्यंत त्याचा विकास होणेच शक्य नाही. आणि

हा आत्मविश्वास जोपर्यंत नीतिमत्तापूर्ण असत नाही तोपर्यंत त्यांच्या विकासाला पूर्णच येऊन ते सृजनशील जीवन निर्मितीसाठी उपकारक ठरत नाही. धम्माने माणसाच्या मनाच्या अवस्थेवर सर्वाधिक जोर दिला आहे.

आंबेडकर लिहितात जर माणूस एकटा असेल तर त्याला धम्माची गरज नाही परंतू दोन माणसे कोणत्याही बंधनांनी एकत्र आली की, त्यांना अवडो अगर नावडो, धम्म हा पाहिजेच, त्यापासून त्यांची सुटका व्हायची नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे कोणताही समाज धम्माशिवाय असूच शकत नाही. ज्यांना स्वातंज्य हवे आहे त्यांना धम्म पाहिजेच तर धम्म म्हणजे आहे तरी काय आणि त्याची आवश्यकता ही का भासते? या प्रश्नांची उत्तरेही डॉ. आंबेडकर आपल्याला देतात. त्यांच्या मताप्रमाणे धम्मात प्रज्ञा आणि करुणा असते असे बुध्द मानीत होता. प्रज्ञा म्हणजे काय? आणि ती कशासाठी? प्रज्ञा म्हणजे निर्मल बुध्दी, बुध्दाने प्रज्ञेला आपल्या धम्माच्या दोन आधारस्तंभापैकी एक मानले आहे. करुणा म्हणजे प्रेम, या प्रेमभावशिवाय  समाज ना जगू शकणार ना विकसित होणार. म्हणूनच बुध्दाने करुणेला आपल्या धम्माचा दुसरा आधारस्तंभ मानले आहे. प्रज्ञा आणि करुणेला आपल्या धम्माचा दुसरा आधारस्तंभ मानले आहे. प्रज्ञा आणि करुणेचा अलौकिक संगम म्हणजेच बुध्दाचा धम्म आंबेडकरांनी धम्म आणि धर्म याचा भेद करुन जे विचार व्यक्त केलेले आहेत ते समजून घेऊनच धर्मांतरांच्या संकल्पनेचा विचार करता येईल. धम्माची आंबेडकरांनी दिलेली व्याख्या दुर्लक्षित केली तर धम्मा चा धर्म करायला फार वेळ लागणार नाही. मग धर्माने जे अनर्थ केले त्यांचीच शिकार बनावे लागेल. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म हा धर्मापेक्षा तत्वतः आणि मूलतः वेगळा आहे हे स्पष्ट करतांना, धर्माचा उद्देश हा जगाचा मूळ शोधण्याचा आहे तर धम्माचा हे जग बदलण्याचा ते अधिक चांगले करण्याचा आहे असे सांगितले आहे.

बौध्द धर्म का स्वीकारला याचे कारण सांगतांना ते म्हणतात, कारण यात समता, बंधुभाव आणि स्वातंज्य आहे. इतर धर्मामध्ये ईश्वर आणि आत्मा यांचेशिवाय दुसरे काही नाही. मनुष्यमात्राच्या उन्नतीला ती जी तीन कारणे आहेत त्यांचा इतर धर्मामध्ये समावेश केलेला नाही. बौध्द धर्माचे अधिष्ठान, जगात दुःख आहे हया तत्वावर बसविलेले आहे. ईश्वर व आत्मा यांचेवर बसविलेले नाही. माणसे जगामध्ये दुःखी आहेत हया तत्वावर बसविलेले आहे. इतकेच नव्हे तर त्या दुःखाचे निवारण करणे व ते निवारण्याचा मार्ग दाखविणे हे धर्माचे अंतिम ध्येय आहे. असे भगवंताने सांगितले आहे. जो धर्म कसोटीला उतरणार नाही. त्याला धर्म म्हणता येणार नाही. असे भगवंताने सांगितले नाही. या कारणामुळे ती बौध्द धर्म स्वीकारला आहे. दुःख निवारण्याकरिता प्रज्ञा पारमिता बुध्दाने सांगितली आहे.

कु. अनिता रा. राऊत
बी.ए. भाग - ३

# आंबेडकरांच्या चळवळीचा आणि जीवनाचा मराठी कवितेवरील प्रभाव

प्रास्ताविक :

केशवसुतांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्माअगोदर दोन वर्षापूर्वी अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ही कविता लिहिली.

आम्ही नीच बा आणि ते लोक थोर
तया पाहता होईजे नित्य दूर

असे आपल्या बाळाला सुधे बोलणाऱ्या मातेला उद्देशून ते कवितेचा शेवट करतात. दसरा या कवितेत गोविंदाग्रजांनी रुढींचे सीमोल्लंघन हाच दसरा असा इशारा देवून पूढे म्हणतात,

रडत बैसले महारमांग
दीनपणाला गर्वे छळते
अज्ञानाला भिवुनि पळते
त्यां वर घ्याया नच ते वळते
उच्चत्वा त्या लावा आग

ज्या काळात या कवींनी हा विषय मांडला त्या काळात बाबासाहेब आंबेडकर भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर यायचे होते. तरीही जातिव्यवस्थेचे, शुद्रशोषणाचे व बहिष्कृततेचे पडसाद मराठी कवितेतून तुरळकपणे उमटत हो. प ण एवढे खरे की हा तुरळकपणा बाबासाहेबांच्या उदयानंतर आणि अस्तानंतरही तुरळकच राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन संघर्ष, त्यांची आंतरिक युगवेदना, त्यांचा विद्रोह व शोषणग्रस्त प्रस्थापित व शासन सुरक्षित धर्मव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा त्यांनी केलेला युगनिषेध मराठी साहित्याचा अपरिहार्य व अपरंपार विषय णला नाही. तो विषय साहित्यातून येण्यासाठी जन्मानुजन्मे युगानुयुगे तळागाळात ठेवण्यात आलेल्या पददलितांना, बहिष्कृतांना, शुद्रांना व अस्पृष्यांनाच हातात लेखणी घेऊन व्यक्त करावा लागला. पण त्यासाठी देखील त्यांना करावा लागलेला संघर्ष आणि पहावी लागलेली वाट फार मोठी आहे. प्रा. श्री. नेरुरकर आपल्या लेखात लिहितात : दबला गेलेला , आजवर ज्ञानाला पारखा झालेला, कान असूनही बहिरा केलेला, व डोळे असूनही सृजनशक्तीचा सागर अंतःकरणात उसळत व घुसळत असताही निर्मितीप्रक्रियेला पारखा झालेला असा दलित वर्ग बाबासाहेबांनी युगमंत्र पुकारताच हतबुध्द व हवालदील झालेला भारतीय दलित वर्ग सळसळून जागा झाला, खडबडून उभा ठाकला. शिक्षणाने, संघटनेने व चळवळीने सक्रीय झाला. त्याची हिसकावून घेण्यात आलेली

अस्मिता त्याला परत अनेकपट उत्तुंग होत व आत्मबळाचा प्रचंड आवेग प्राप्त करीत सप्राण व सतेज मिळाली. त्याने हातात लेखणी घेतली तो अपरिहार्य आंतरिक उत्स्फूर्तपणे व प्रक्षोभाने लिहू लागला. तोपर्यंत स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य निर्मितीची बावीस तेवीस पांढरपेशी वर्षे उलटलेली होती. १९६० साल उजाडले आणि त्याच काळात अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, नारायण सूर्वे, षाहिरी, कथा, कादंबरी, कविता आपले विचार धन समोर मांडीत मराठी पांढरपेषा रसिक वर्गाला कामगारवर्गीय, दलित वर्गीय, साहित्य निर्मितीचे आजवर अनोळखी, अननुभूत असलेले धक्के देऊलागले. क्रांतिकारकत्वाची, जगबदलाची साक्ष ते घालू लागले आणि मग मराठी साहित्यात डॉ. आंबेडकर व आंबेडकरी चेतना प्रेरणा प्रकर्षाने जाणवू लागली. नेरुरकरांच्या लेखातील हा सविस्तर भाग मुद्दाम येथे दिला कारण त्यावरुन डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा, कृतीचा आणि पिकवणुकीचा दलित वर्गावर झालेला जबरदस्त परिणाम आणि साहित्यनिर्मितीचा विस्तार लक्षात येवू शकतो.

त्र्यंबक सपकाळे :-

यांचा सुरुंग हा काव्यसंग्रह त्याच्या नावानेच आंबेडकरांच्या विचाराने पेटून उठल्याचे निदर्शक आहे. हा काव्यसंग्रह पारंपरिक व्यवस्थेला हादरा देणारा आहे. आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांची आठवण तसेच भगवान बुध्दाचया करुणेचीही आठवण देणारी आहे.

परंतु आता ते सर्व वर्ज्य आहे
मी पाइक झालो ना
भगवंताच्या तत्वज्ञानाचा
प्रज्ञा करुणेचा - सुरुंग, पृ. ३६

सुरुंग या काव्यसंग्रहातील प्रखर जाणीव, स्फोटकता लक्षणीय आहे.

यशवंत मनोहर : यांचा काव्यप्रवास प्रदीर्घ असून त्यांनी कवितेला वेगळे परिणाम प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा क्रांतिविचार समजून घेऊन व्यवस्थेतील सामाजिक आणि वैयक्तिक शोषणाचा प्रकार त्यातील सूक्ष्म तपशिलासह जाणण्याची क्षमता व त्याविरुध्द प्रतिक्रियात्मक आणि रचनात्मक उठाव करण्याच्या जिद्दीसह यशवंत मनोहरांची कविता साकार झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे त्यांच्या जीवनातील स्थान वेगळे असल्यामुळे त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांचे त्यांच्या जीवनातील स्थान वेगळे असल्यामुळे त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर स्वतंत्र

आंबेडकर : एक चिंतनकाव्य नावाचा काव्यसंग्रह लिहिला आहे. या काव्याला अनेक भावनिक उमाळ्याचा स्पर्श झाला आहे. या भावनिक उमाळ्यातूनच या प्रदीर्घ कवितांचा जन्म झाला आहे. शब्दप्रामाण्याला आणि ईश्वर वादाला छेद देवून आंबेडकरी विचारांनी प्रेरित झालेला हा कवी आपल्या कवितेतून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतो.

केशव मेश्राम : केशव मेश्राम यांनी एकंदरच समाजजीवनावर व कवीमनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा झालेला परिणाम मान्य करुन त्यांच्या विषयी कृतज्ञतापूर्वक आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आपल्याला घडवण्यात डॉ. आंबेडकरांचा विचार आणि कार्य कारणीभूत आहे हे तर खरेच पण त्याचबरोबर आपल्या आधीच्या पीढीलाही डॉ. आंबेडकरांनी जागृत केले म्हणूनच आपण घडू शकलो असे कृतज्ञतापूर्वक उद्‌गार काढले आहे.

इतक्या अक्षरोच निळेजर्द आभाळ बाबा !
तुझ्यामुळेच उभे आहे माझ्या डोक्यावर....
एक दिवस मीलच्या कामाचा खडा करुन
टरकलेल्या माझे बखोट गच्च धरुन,
मला म्युनिसिपाल्टीच्या शाळेत बापाने अडकवून टाकले
बाजूने कडुनिंबही तेव्हा गर्द उन्हात लाजले होते....
तू ढवळलेल्या तळयाच्या पाण्याच्या चवीने
आमची जीभ सुरसवंती बनली आहे
बोट धरुन तूच नेलेस घटनेच्या न्यायमंदिरात
आता माझ्या मागण्या मीच ठामपणे मागू लागलो आहे
कोण्याही ग्रंथाची साक्ष शपथ न घेता देखील
आमच्या प्रामाणिक कैफियती मीच लिहू लागलो आहे.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात किती परिवर्तन घडवून आणले आहे याची साक्ष म्हणजे ही कविता आहे. शिक्षणाने माणूस सुधारतो हे जाणल्यानेच डॉ. आंबेडकरांनी समाजातल्या तळागाळातल्या व्यक्तींना शिक्षणाचा आग्रह केला, शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले; हिंमत दिली, मार्गदर्शन केले म्हणूनच समाज जागा णला आपल्या पोराबाळांनाही घडवता आले.

राम दोतोंडे :-
रापी जेव्हा लेखणी बनते या काव्यसंग्रहात कवी समाजातील विसंगतीवर नेमकापणाने बोट ठेवले आहे.

हे बाबा रापीने कातडे कापण्याऐवजी
का कापले नाहीत
येथल्या राक्षसी रुढींचे नाळ?
वादीने तळ कापण्याऐवजी
का शिवले नाहीत
येथल्या मना मनात
समता स्वातंत्र्याचे जाळे - रापी जेव्हा लेखणी बनते
असा खडा सवाल ते विचारतात.

संध्या रंगारी :-
ही नांदेड येथील कवयित्री असून आघात नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. त्यातून आंबेडकरी विचारांचा वसा जतन करणाऱ्या या कवयित्रीने स्त्रियांच्या बद्दलची अन्यायाची चीड व्यक्त केली आहे.

जरी मारलंत तुम्ही माझ्या मायला
तरी मी तशी मरायची न्हाय
कारण बाबांचा ध्वज
माझ्या खांद्यावर हाय
म्हणून मी तशी मरणार न्हाय
अन्यायावर आघात करणार हाय....!
भला माणूस म्हणून जगायचं हाय !

विजयकुमार गवई :
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने नवा सूर्य आला त्यांनी दलितांना अस्मिता दिली. शिक्षणाचा उजेड दिला. त्या नव्या सूर्याची किरणं वस्त्यावस्त्यात, घराघरात उधळत गेली त्या सूर्याचे वर्णन या कवीने आपल्या कवितेतून केले आहे.
कारण थो सूर्य होता

आंबेडकर नावाचा
धग ओकणारा
अन् त्या धगधगणाऱ्या ज्योतीनं
मग अंधार पेटला – मग अंधार पेटला, पृ. १३

बाबासाहेबांविषयीची भावना यातून व्यक्त होते. बाबासाहेबांच्या कार्याला जागून आपापसातील भेदभाव विसरुन पंचशील ध्वजाखाली येऊन राष्ट्रीय एकात्मतेला जपायचे आहे असे श्रीधर सरपे आपल्या सलोखा या काव्यसंग्रहात म्हणतात. आंबेडकर दलितांच्या चळवळीचे उद्गाते असल्यामुळे दीनदलितांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या प्रेरणाशक्तीचे स्मरण म्हणून त्यांच्या कवितेत व्यक्त झाले आहे. भुजंग मेश्राम यांच्या कवितेत आंबेडकरांचा मोठेपणा व्यक्त करताना समुद्रपुत्र या कवितेत ते म्हणतात,

आभाळाची लाज राखताना तूच तर झाला होतास ना
क्षितिजाच्या खांद्यावर खेळणारा फिनिक्स
उघडी जखम घेऊन चालताना सनातन सावल्यांचे
चक्रवाही लपंडाव बघून गणांच्या रक्तपेशीतली
स्वप्नांची लिपी तूच तर कोरली होतीस
पहाडांच्या ओल्या छातीवर – उलगुलान, पृ. ४३

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नाने आमच्या झोपडी झोपडीतून आता ज्ञानसूर्य प्रकाशू लागला त्याला आता सत्य असत्य, बरेवाईट कळू लागले आहे कुणी धर्त राजकारणी आता त्याला फसवू शकत नाही हे भानही बाबासाहेबांच्याच विचारांनी आले असल्याचे नामदेव ढसाळ आपल्या अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा कवितेत म्हणतात,

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाडयात
किती दिवस राहायचं आम्ही
श्वास घुसमटत – नामदेव ढसाळ गोलपिठा, पुणे पृ. ६

भारतीय समाजात पुर्वी चातुर्वर्ण समाज व्यवस्था होती. अशा चातुर्वर्ण व्यवस्थेच्या विरोधात समतेचा विचार मांडणारे सर्वसामान्य माणसाचे जीवन उंचावण्याकरिता तत्वज्ञान सांगणारे तथागत बुध्द हे पृथ्वीवरील पहिलेच मानव होते. त्यांच्या शिकवणीमध्ये मनुष्य हा केंद्रस्थानी आहे. बुध्दाने खालील पंचशील तत्वे सांगितले.

१. कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणे व त्याला इजा न करणे.
२. चोरी न करणे.
३. व्यभिचार न करणे
४. असत्य न बोलणे
५. मादक पेय ग्रहण न करणे

या तत्वाने प्रत्येकाने पालन केले तर एक सुदृढ समाजव्यवस्था निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. पंचशील तत्वासोबत तथागत बुध्दाने चार आर्यतत्वे सांगितली.

१. जीवनात दुःख आहे.
२. दुःखाचे कारण तृष्णा आहे
३. दुःखाचा निरोध संभव आहे
४. प्रतिपाद

त्याचप्रमाणे खालील अष्टाागिक मार्ग बुध्दाने सांगितला आहे.

१. सम्यक दृष्टी :–

माणसाचा दृष्टीकोन जगाकडे पाहण्याचा कल हा प्रकारमार्गी असावा. तथागत म्हणतात, जग ही एक अंधार कोठडी आहे. त्यात आपण कैदी आहोत आपल्या डोहयांना अंधारासारखी एखादी वस्तु असावी अशी दृष्टी आहे. माणसाजवळ मन आहे त्यात इच्छाशक्ती आहे. त्या इच्छाशक्तीला कोणाचा दिशेने गती द्यावी, एवढा जरी प्रकाश त्याला मिळाला तरी तो जीवनात सार्थक करेल.

२. सम्यक संकल्प :–

संकल्प अर्थात निग्रह केल्याशिवाय माणूस होता येत नसते. माणूस होण्यासाठी ध्येय, आकांक्षा आणि महत्वाकांक्षा असाव्या लागतात ती उदार आणि प्रशंसनीय असली पाहिजेत ती शूद्र आणि अयोग्य नसावी.

३. सम्यक वाचा :–

माणसाने एकमेकांशी प्रेमाने बोलावे. सत्य आपुलकीने व सौजन्याने बोलावे, तरच मानवी समुहात सकारात्मक आंतरक्रिया होईल. असाच बोलण्याने निंदानालस्ती केल्याने राग केल्याने मूर्ख बडबड केल्याने समाजानी हानीच होणार आहे.

४. सम्यक कर्मात :–

कर्म म्हणजे कार्य भगवान तथागतांचा संपूर्ण धम्म हा कर्मावरच आधारलेला आहे. कर्म म्हणजे वर्तन तुम्ही जसे वर्तन कराल तसे फळ प्राप्त होईल. समाजात वर्तन करतांना समाजाचे हक्क व भावना यांचा भान राखायला पाहिजे एक दुसऱ्याची भाषा जाणली पाहिजे. तथागत सांगतात की, जीवनाच्या मुलभूत नियमांशी सुसंगत असे वर्तन करता आले पाहिजे.

५. सम्यक आजिविका :-

आजिविका म्हणजे उदरनिर्वाह प्रत्येक सजीवाला उदरनिर्वाह आवश्यक आहे. वाढ हालचाल श्वसन उत्सर्जन, प्रजनन ही सजीवांची लक्षणे आहेत. याशिवाय सजीवाला पूर्णत्व येत नाही. याचे भान असावे व्यवसायाने दुसऱ्यांना त्रास होणार नाही असे व्यवसाय निवडाने राज्य करतांना जनहितकारी निर्णय घ्यावेत असे तथागत सांगतात.

६. सम्यक व्यायाम :-

व्यायाम म्हणजे प्रयत्न मनात वाईट विकार विचार निर्माण होत असल्यास त्यास नियंत्रणात ठेवणे व चांगल्या विचारांना बळ देणे, प्रेरणा देणे जेणे करुन अकुशल विचारांचा प्रभाव नाहीसा होऊन कुशलक कार्याचा प्रभाव वाटेल.

७. सम्यक स्मृती :-

स्मृती म्हणजे आठवण ही आठवण सतत ताजीतवाणी राहायला हवी, वाईट अनुभव आला असेल तर त्यातून काय शिकायंच, चांगला अनुभव आला असेल तरीही चित्रात समता कशी ठेवावी, यासाठी जागरुकतेची आवश्यकता असते. दृष्ट वासना मनात प्रवेश पाहतात तेव्हा प हारेकरी होऊन त्यांना मनाबाहेर घालविणे हे सम्यक स्मृतीचे कार्य आहे. माणूस होण्यासाठी सम्यक स्मृती महत्वाचे कार्य करते असे तथागत सांगतात.

८. सम्यक समाधी :-

सम्यक समाधी ही मानवाला माणूस बनवण्यात अहम भूमिका निभावते. त्यामुळे सम्यक समाधीचा अभ्यास काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. समाधी म्हणजे ध्यान भावना असे एक प्राथमिक मत आहे. पण तथागत सांगतात की हे मत पुरेसे नाही. ध्यानभावनेशी त्यांचा संबंध येतो. हे ज्ञानापुरता माणूस बनू पाहणाऱ्या मानवाच्या मार्गावर पाच अडथळे येतात. लोभ द्वेष आळस स्तुती व संशय ही पाच अडथळे दुर करण्याचा मार्ग म्हणजे सम्यक समाधी होय.

समाधी म्हणजे एकाग्रता, मनाची शुध्दता तुम्ही ऑफीसमध्ये काम करीत आहात, नांगर चालवित आहेत, अध्ययन करीत आहात. अध्यापन करीत आहात.... त्या त्या वेळी तुमचे मन शुध्द हवे. विकारांचा शिरकाव झाला तर चल विचलित होईल आणि कार्य पूर्णत्वास

जाणार नाही. सदाचारांच्या मार्गाव्यतिरीक्त बुध्दाने दहा सद्‌गुणांचीही त्यास जोड दिलेली आहे. दैनंदिन जीवनात त्याचे आवरण करावे असा बुध्दाचा संदेश आहे.

सुमारे तीन हजार वर्षापुर्वी तथागत बुध्दांनी निर्माण केलेल्या मानवजातीच्या स्वातंञ्याचा उद्‌घोष करणाऱ्या आणि त्यांना नवजीवन देणाऱ्या बुध्द धम्माची प्रज्ञा शील करुणा स्वातंञ्य समता बंधुता मैत्री प्रेम ही विश्व शांती निर्माण करणारी मूल्ये आहे. बुध्दाने धम्माला मानवी मूल्यांचा आधार दिला. ईश्वर आत्मा ग्रंथप्रमान्य नाकारणाऱ्या तत्वविचाराचा मूलसिध्दांत दिला. सर्वांसाठी ज्ञानाचा मार्ग मोकळा केला. मैत्री बंधुभावाला विकसित करणारी प्रेरणा केलेली विषमता व तिचे नियम नाहीसे करण्यास सांगितले हे बौध्द धम्माचे स्वरुप म्हणजे मानवी अधिकाराचा जाहीरनामा झाले आहे. म्हणून समाज शांती प्रस्थापित करणारा धम्म म्हणून बौध्द धम्माचा जगभर प्रचार व प्रसार झाला.

या भारतभूमीवर मानवी कल्याणासाठी आजपर्यंत तीन धम्मचक्रप्रवर्तन घडून आले. पहिले धम्मचक्र प्रवर्तन गौतम बुध्दाने सारनाथ येथे मृगदायवनात पंचवर्गीय भिक्षुंना उद्देशून धम्म सांगितला हेच पहिले धम्मचक्र प्रवर्तने होय या धम्मचक्र प्रवर्तनास उत्क्रांतीचा सिध्दान्त म्हटलया जाते. कलिंग युध्दातील महाभयंकर रक्तपात पाहून द्रवलेल्या व्यथीत झालेल्या मनाने सम्राट अशोकाने याच भारतभूमीवर दुसरे धम्मचक्र प्रवर्तन घडवून आणले. हे धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे मानवी हृदय परिवर्तन होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मचक्र प्रवर्तन हे तिसरे धम्मचक्र प्रवर्तन होय की, हया धम्मचक्र प्रवर्तनामुळे लाखो जीवांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला.

आज भ्रष्टाचारापासून ते स्त्री भ्रूण हत्या करण्यापर्यंत भारतीय समाजाचे नैतिक अधपतन झाल्याने सत्य आपल्या समोर आहे. जगातील विद्यमान पारंपारिक धर्माचे ते अपयश होय. उलट धर्माच्या माध्यमातून नीतिमत्तेचे शिक्षण समाजाला देण्याची जबाबदारी असलेले तथाकथित साधुसंत बाबा बापू ही मंडळीच करोडोची संपत्ती जमवित आहे. लिंग पिसाट होत जीवन जगत आहे. मार्गदर्शकांच्याच या नैतिक अधःपतनामुळे संपूर्ण मानवजात धोक्यात येत आहे. आजच्या अशा परिस्थितीत सामाजिक नीतिमत्तेला मुख्य आधार मानणारा बौध्द धम्माच मार्गच मानवतेसाठी एकमेव आशा आहे. जे स्थान धर्मात देवाला असते किंवा ईश्वराला असते ते स्थान धम्मात नीतीला असते. बौध्द धम्माने जातीय दंगली पेटवल्या नाहीत जगा आणि जगू दया तत्वाचा बौध्द धम्माने प्रसार केला. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी बुध्दाचा धम्म हा एकमेव मार्ग आहे.

कु. शुभांगी अ. पुरोहित
बी.ए. भाग - ३

# डॉ. आंबेडकरांची शिक्षणविषयक संकल्पना व आजचे वास्तव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संबंध आयुष्य अस्पृश्यता आणि जातीयता यांच्या निर्मुलनाच्या संघर्षासाठी घालविली. वर्ग-जात आणि व्यक्तित्व यांच्यासाठीच्या सर्व हितसंबंधांना भेदून डॉ. आंबेडकर बहुसंख्य वर्गाच्या कल्याणासाठी झिजले. शोषीत वर्गाच शिक्षण झालं पाहिजे. हा त्यांचा आग्रह होता. अशाच उदात्त हेतूने प्रेरित होवून केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ च्या संविधान अधिनियमान्वये अनुच्छेद २१(अ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मुलभूत अधिकाराचासमावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या २७ ऑगस्ट २००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. भारताच्या इतिहासातील हा पहिला कायदा आहे. जो पंतप्रधानांच्या भाषणाद्वारे लागू करण्यात आला. १ एप्रिल २०१० पासून हा कायदा संपूर्ण भारतात (जम्मू आणि काश्मीर वगळता) लागू करण्यात आला.

डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक विचारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. आंबेडकरांचे गुरु महात्मा गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा जोतीराव फुले या महापुरुषांच्या स्वप्नांना अधिक क्रियाशील अधिक धारदार आणि सक्षम बनविले. ज्ञान म्हणजे प्रकाश ही ज्ञानाची अतिसुंदर व्याख्या बुध्दांनी जन समुदायासाठी केली. संत कबीर यांनी आपल्या दोहयामधून वर्ण, जात, धर्म आणि एकंदर विषमतेच्या पायावर उभ्या असलेल्या भारतीय समाज व्यवस्थेविरुध्द हल्ला केला आहे. जोतीराव फुलेंचे विचार जसे कृती करणारे ते क्रांतीकारक होते. स्त्रीशिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण, समाज शिक्षण यावर त्यांनी ऐतिहासिक कार्य केले. आंबेडकरांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन विधायक आणि रचनात्मक होता. शिक्षण हा सामाजिक, आर्थिक, राजकीय क्रांतीचा मुलाधार आहे असे त्यांचे सांगणे होते. तुमचा उध्दार करण्यास आता एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे राजकारण, कायदा करण्याची शक्ती, पोटभर अन्न, राहण्यास जागा व द्रव्यार्जनाचे साधन मिळत नाही याला कारण देव किंवा दैव दोन्हीही नाही. तुम्हाला अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण देणे हे या देशातील कायदे करणाऱ्या सत्तेचे कार्य आहे व त्या सत्तेचा कारभार तुमच्या संमतीने, साहायाने, सामर्थ्याने चालणार आहे.

डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला हा शोषण मुक्तीचा मार्ग जणू समाजवादी तत्वज्ञानाचेच नवे

रुप आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या तीन तत्वात डॉ. आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक विचाराचे सार आहे. क्रियाशील बनणं, अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करणे आणि त्या ध्येयासाठी संघटन बांधणे म्हणजेच क्रांतीचा मार्ग खुला करणे होय. डॉ. आंबेडकर असो वा कोणताही महापुरुष असो क्रांतीसाठी लागणाऱ्या पूर्ण आवश्यकता त्यांना अशा स्पष्टपणे मांडाव्या लागतात. डॉ. आंबेडकरांनी त्या मांडल्या त्यांच्या दृष्टीने शिक्षण हिच शोषण मुक्तीची पायवाट होती. भारतातील पददलित स्त्रिया यांच्या दैन्यवस्था रामबाण उपाय म्हणजे शिक्षण होय अशी त्यांची खात्री होती. प्रत्येक मनुष्याला आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते तेव्हा तिचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते. डॉ. आंबेडकरांनी शेक्सपिअरच्या नाटकातील हे वचन स्पष्ट केले होते.

शिक्षणाची संधी प्रत्येकांनी साधावी असा सल्ला त्यांनी आपल्या सर्व कार्यकर्त्यांना दिला. संधीचा दुरुपयोग करणे हे वचन त्यांच्या जीवन शिक्षणाचे मुख्य सूत्र होत. डॉ. आंबेडकरांनी देव, दैव आणि धर्मभोळेपणा, नशीब या प्रवृत्तीविरुध्द घाणाघाती हल्ला केला ते म्हणाले, आई-बाप मुलांना जन्म देतात कर्म देत नाहीत हे म्हणणे ठिक नाही. आई बाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात. ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल. यात समाज म्हणजे त्यांची जात नव्हे तर आपला भारतीय समाज होय. डॉ. आंबेडकरांना मुलांच्या शिक्षणा इतकेच मुलींच्या शिक्षणांच महत्व वाटत होत. हे त्यांच्याि शक्षणविषयक विचारांचे वैशिष्टये म्हटले पाहिजे. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोध्दार हा परिणाम कारक शिक्षणाचं ध्येय होय. शिक्षणातून व्यक्तिमत्वाचा जन्म होतो ही बाब खरीच आहे आणि जीवन तरी असते काय?

आपण आपल्यातल्या व्यक्तिमत्वाचा घेतलेला शोध असतो. स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा प्रयत्य, आत्मविश्वास, आत्मआदर आणि व्यक्तिमत्वाची प्रतिष्ठा निर्माण करण्याची क्षमता शिक्षणात असणं आवश्यक असते. त्यातूनच स्वतःच्या कर्तृत्वावर भक्कम विश्वास असलेला माणूस पण वृध्दींगत होत असतो. स्वतःचा स्वतःनेच करावयाचा विकास म्हणजे डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली आत्मोध्दाराची संकल्पना होय. व्यक्तिमत्वाचा शोध लावणारं बीज शिक्षणात असाव ही त्यांची अपेक्षा होती.

डॉ. आंबेडकरांना मानवतावादाचा संस्कार करणारे शिक्षण हवे होते. जात, धर्म, वर्ण यांना नष्ट करणाऱ्या शैक्षणिक विचारांची बाजू त्यांनी उचलून धरणे स्वाभाविक होते. अस्पृश्यता, गुलामगिरी, अप्रतिष्ठा यांचे दाहक काटे त्यांना जिव्हारी लागले होते. हजारो वर्षाच्या

कालखंडानंतर त्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या उच्चतम मूल्यांची किंमत कळालेली होती. ही मूल्ये म्हणजे गौतम बुध्दाने जगाला दिलेली अमोल देणगीच होय. शिक्षण ही विकासाची पायवाट त्यांना वाटत होती. विकासासाठी स्वातंत्र्य त्यांना हवे होते आणि स्वातंत्र्य हे मूल्य शिक्षणाशिवाय सापडणार नाही. स्वावलंबनासाठी समता हवी होती तर स्वभिमान प्रदान करणारी बंधुता त्यांना अभिप्रेत होती. हे सर्व शिक्षणातून निर्माण होईल असा विश्वास होता. त्यासाठी सर्वांसाठी शिक्षण खुले हवे होते. त्यांच्या मते शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे. शिक्षण म्हणजेच परिवर्तन शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यायला हवेच असा आग्रह त्यांचा होता. व्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण होय. अशी शिक्षणाची व्याख्या त्यांनी केली. शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ पशू असे  त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर म्हणतात उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होवून अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहील्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. सावित्रीबाई फुले शिक्षणाचे महत्व सांगतांना म्हणतात. शुद्रांना सांगण्यायोगा एकच मार्ग हा शिक्षणाने मनुष्याचे पशुत्व हरपते पहा. गाडगे महाराजांनी शिक्षणाचा अर्थ कीर्तनातून सांगितला. शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ धोंडा इतका सोपा व सहजसुंदर विचार जगातल्या किती शिक्षण तज्ञांनी मांडला आहे. डॉ. आंबेडकरांनी सांगितले होते. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपूरतीच बंदिस्त करु नका, तिच तंत्र खेडयापाडयातील गडद अंधकार दूर होईल अस परावर्तीत करा. समुदाय शिक्षणाच महत्व जगणारे शिक्षणतज्ञ डॉ. आंबेडकर होते हे इथं पटते.

आंबेडकरांचे मते शिक्षण हे माणसाला घडवित असते जे माणूस घडविते ते शिक्षण. असे त्यांचे मत होते. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम. केवळ ज्ञान उपयोगाचे नाही तर जे उपयोगाला येते तेच खरे ज्ञान अशी त्यांची धारणा होती. शिक्षणाचा परिणाम शील आणि चारित्र्याची निर्मिती करणे, शिक्षण हे मूल्याधिष्ठीत म्हणजेच उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे. त्यांच्या मते लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता/समाज नैतिक मूल्याधिष्ठीत शिक्षणाद्वारे संस्कारीत असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षीत समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षीत व मूल्याधिष्ठीत समाजाची लोकशाही ही यशस्वी ठरु शकेल.

संत तुकडोजी महाराज म्हणतात, माणूस सामुदायिक करायचा म्हणजे पहाडातले दगड एकत्र आणून बसविणे नव्हे, माणसाला माणूस म्हणून जगायचे शिक्षण द्यायचे असते.

पंडित जवाहरलाल नेहरु म्हणतात, एका पुरुषाला साक्षर केले तर एक व्यक्ती सुधारते पण

एका स्त्रीला साक्षर केले तर सारं कुटुंब सुधारते.
महात्मा बुध्द म्हणाले होते, माणसांच्या सर्व प्रश्नांची मुळ त्याच्या अज्ञानात आहेत.
उच्चतम शैक्षणिक धोरण :-

१. १४ वर्ष वयापर्यंत मुलामुलींना मोफत व प्राथमिक शिक्षण देणे, मुलींना पदवी पर्यंत मोफत शिक्षण व शिष्यवृत्ती देणे.

२. महाविद्यालयात संगणक कक्ष, इंटरनेट व पूर्णवेळ संगणक शिक्षकाची नियुक्ती करणे आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संगणक व इंटरनेटच्या सुविधेसह कक्ष उभारणी करणे.

३. विद्यार्थ्यांचा मैदानी व सांघिक खेळाचा विकास होण्यासाठी सर्व प्रकारची सुंदर मैदाने व भरपूर खेळ साहित्य व्यायामशाळेची उभारणी करणे, महाविद्यालयाचा परिसर निसर्गरम्य होण्यासाठी इमारती समोर बागबगीचा असणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासासाठी विविध महाविद्यालयीन उपक्रम आयोजनासाठी अत्याधुनिक सभागृहाची आवश्यकता आहे.

५. प्रगत विज्ञानाचा मार्ग हा शाश्वत सुधारणेवर आधारलेला असावा यासाठी प्रयोग करतांना जिज्ञासेला वाव मिळाला की नवनवीन शोध निर्माण होतात. त्यातून मुलांना सर्वांगीण विकास वाढीला मदत होते यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा असावी.

६. सुसज्ज इमारत व स्वच्छ सुंदर, सुशोभित परिसर आकर्षक प्रवेशद्वार, सुसज्ज बोलका व्हरांडा, वर्गसजावट केलेल्या वर्गखोल्या, वेगवेगळया कुंडयातील वृक्षवेलींनी सुशोभित झालेला परिसर, सर्वत्र स्वच्छता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरेशी सुलभ शौचालये.

७. विद्यार्थी, शिक्षक यांच्यामध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी आणि व्यक्तिमत्व विकासासाठी संपन्न ग्रंथालय आवश्यक आहे.

८. ज्या विद्यार्थ्यांना घरी अभ्यासासाठी पुरेशी सोय नाही किंवा वातावरण नाही त्यांना सकाळ, संध्याकाळ किंवा सुटीच्या दिवशी अभ्यासासाठी अभ्यासिका गरजेची. वसतीगृह बांधण्याची आवश्यकता.

९. विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य इत्यादी सुप्त कलागुण विकासासाठी स्वतंत्र कलादालनाची निर्मिती सर्व साहिलयासह आवश्यक आहे.

१०. बदलत्या आधुनिक शैक्षणिक साधनांचा वापर अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत करुन विद्यार्थ्यांना प्रभावी शैक्षणिक प्रक्रियेचा अनुभव देणे यासाठी ई-क्लास निर्मिती गरजेची आहे. अध्ययन प्रक्रियेत एल.सी.डी., प्रोजेक्टर, संगणक, इंटरनेट यांच्या माध्यमातून फोटो,

व्हिडीओ, स्कॅप वरुन तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे.

११. विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबर जीवन कौशल्य प्राप्त करणारे कृतियुक्त शिक्षण उभारणे विद्यार्थी व शिक्षकांची इंग्रजी उच्चार व संभाषण प्रभावी होण्याकरिता आर्थिक दृष्टया समृध्द महाविद्यालयात डिजीटल इंग्लीश स्पोकन लँग्वेज लॅब ची उभारणी करणे.

१२. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परिक्षांना सामोरे जावे लागते. या परिक्षेत उज्वल यश प्राप्त करण्यासाठी तज्ञ मार्गदर्शक सराव परिक्षांचे अचूक वार्षिक नियोजन करुन गुणवत्ता वाढविता येते.

आव्हाने :-

१. आजचे विद्यार्थी ज्या विद्यापीठाचे शिक्षण घेतात त्यांच्या कारभाराकडे मुळीच लक्ष घालत नाही. विद्यार्थ्यांनी काय शिकावं हे विद्यापीठे ठरवित असले तरी आपल्या बौध्दीक विकासाला आपण शिकतो ते खरोखर पोषक व आवश्यक आहे की नाही हे प्रत्येक विद्यार्थ्यांने पाहिले पाहिजे.

२. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी महाविद्यालयात होत असते तो राष्ट्राचा आदर्श नागरिक होणार की त्याची जीवीत विफल होणार हे हा शिक्षणक्रम ठरवित असल्यामुळे विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर विद्यार्थ्यांचे कटाक्षाने लक्ष वेधले पाहिजे पण आजचे विद्यार्थी त्या दृष्टीने अगदी बेपर्वा असतात.

३. उच्च विद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांची कॉलेजची चार वर्ष संपून जातात आणि विद्यापीठाच्या पदव्या घेवून बाहेर पडतात. पण त्यांना प्टो, ॲरिस्टॉटल, बेकन, नित्से या सारख्या महाश्रेष्ठ तत्वज्ञानांच्या तत्वज्ञानासंबंधी काहीच माहिती नसते.

४. विद्यार्थ्यांनी या गोष्टी स्वतः ओळखला पाहिजेत आणि आपल्याला योग्य शिक्षण पाहिजे याचा पाठपुरावा केला पाहिजे.

५. मानवी जीवनात वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहीली नाहीत. तो कालमानाप्रमाणे प्रत्यय ही बदलत राहतात. नुसती बदलताच नव्हे तर ती प्रगत होत जातात. भारतीय विद्यार्थ्यीनीही या नव्या नव्या निर्माण होणाऱ्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे आणि आपणही ती आचरणात आणण्यास सिध्द राहीले पाहिजे. हे नवे तत्वज्ञान आपल्या विद्यादायी संस्था आपल्या शिक्षण क्रमात घालतात की नाही याकडे पाहीले पाहिजे.

६. आधुनिक विद्यार्थ्यांची बौध्दीक पातळी रोडावत चालली आहे. भुतकाळातील मानवी प्रज्ञेशी तुलनाच होवू शकत नाही. आजचा विद्यार्थी वर्ग भुतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत यांच्या तत्वज्ञान व वाड्.मय कृतीचा अभ्यास मन लावून करीत नाही.

७. उलटपक्षी आजचा विद्यार्थीवर्ग फुटबॉल, क्रिकेट आणि पोकळ राजकारणात दंग

असतो विद्यार्जन याला एक मोठा अर्थ असतो पण आजचा विद्यार्थी क्रिकेटच्या आणि राजकारणाच्या फंदात ती दिव्य दृष्टी प्राप्त करुनच घेत नाही.

८. स्वयंप्रेरणेने हे विद्यादान होत नाही. शिक्षकाला लागणारी अंतःस्फुर्ती विद्यादानाची हौस आणि त्यासाठी करावा लागणारा अव्याहत व्यासंग या सर्वांचीच त्यांच्याकडे वानवा असते. त्यामुळे अध्यापक ही विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक ज्ञान पाजण्यास असमर्थ झाले आहे.

९. महाविद्यालयांनी आपल्या फी भरमसाठ वाढविल्या आहेत. या फी अशाच वाढू लागल्या तर विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर त्याचा निश्चितपणी अनिष्ट परिणाम होईल. केबन म्हणतो घपेुश्रशवसश ळी ॅ्रिं ज्ञान ही महान शक्ती आहे. विद्यार्थी वर्गाला जर ज्ञानाची कास धरुन आपल्या देशाचा विकास आणि उध्दार करुन घ्यायचा असेल तर त्यांनी विद्यापीठाच्या कारभारात जरुर लक्ष घालून आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे.

१०. सर्व थरातील शिष्यवृत्ती सरकार कमी करत आहे. शिष्यवृत्ती सर्व थरातील विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे त्यासाठी सतत संघर्ष करणे आवश्यक आहे.

कु. पुजा म. चाफले
बी.ए. भाग – १

# काव्य पुष्प
# (मराठी विभाग)

## तहान

■

सरली सुरेख थंडी
फोफावला ऊन्हाळा
संतप्त सूर्य आता
ओकेल तप्त ज्वाळा
पक्षी दिशा दिशांना
फीरतील ते थव्यांनी
सुकतील कंठ त्यांचे
मग शोधतील ते पाणी
सुकली तळी जळांची
पाणी पिण्यास नाही
त्या सानुल्या जीवांची
होइल लाही लाही
त्यांच्या जीवाकरीता
ईतकी कराच सेवा
वाटीत एवढेसे
पाणी भरुन ठेवा....!

कु. पुनम पी. मानकर
बी.ए. भाग - १

## आज क्षणभर

■

का कुणास ठाऊक ?
आज क्षणभर थांबावसं वाटतं.
हरवलं मन,
पुन्हा शोधावसं वाटतं.
अशांत हे मन,
शांत करावसं वाटतं.
होऊन अपेक्षाशून्य,
चिंतामुक्त व्हावसं वाटतं.
थांबवून धडपड सारी,
आज स्तब्ध व्हावसं वाटतं.
भरल्यापोटी,
शांत निजावसं वाटतं.
आज जन्म आणि मृत्यु
अंतर विसरावसं वाटतं
का कुणास ठाऊक
थोडसं प्रेम,
आज स्वतःवर करावसं वाटतं.

कु. मोनाली एम. टीके
बी.ए. भाग - १

## चित्र

चित्र काढ म्हणालीस तेव्हा
कविता लिहीत बसलो
कविता लिही म्हणालीस तेव्हा
नुसताच शून्यात बघून हसलो
शून्यात बघू नकोस
म्हणालीस तेव्हा
तुझ्या डोळ्यांत बघत होतो
तुझ्याप्रमाणे नाही तरी
माझ्यापरीने जगत होतो
हयाला काय जगणं म्हण्तात का
म्हणालीस तेव्हा
अनेक मरणं भोगून झाली होती
तुला भोग कळे कळेतो
वासना वेशीवर टांगून झाली होती
वेस कुठंय म्हणालीस तेव्हा
वेशीपल्याड गेलो होतो
तू रे कोण? म्हणालीस तेव्हा
मी तर तूच झालो होतो
आता तू ही डोळे असून
डोळ्यादेखत विरते आहेत
माझी कविता भाळी गोंदून
चित्र म्हणवत फिरते आहेस

कु. आचल एन. भोयर
बी.ए. भाग - २

## संवेदना

आलिच सुखे जर चालून
दुःखात न्हाऊनी यावी,
सुखातही परदुःखाची
जाणीव मनाला व्हावी...

क्षणी अडखळणाऱ्या
श्वासांचा बहु सराव
जिवाला झाला,
आली जर झुळूक वाऱ्याची
हृदयात वावही द्यावी...

उगवणारं सुर्यबिंब कोवळ
दुपारीला सहज तळपतं,
त्याच्यागत तळपनाऱ्या रागाला
चंद्राची शितलता यावी...

बहु कष्टानं शेत फुलवीलं
धान्याच्या राशी लागणारच,
दारिद्रयाच्या पावलासंगे
मनाची मलिनताही जावी...

रोजचेच रडगाणे संसाराचे
सर्व सुर छेडूनी बेसूर झाले,
एकतरी पहाट अशी उजडावी,
पहीलाच शब्द व्हावा
ज्ञानेशाची ओवी....

कु. मनीषा आर. देवके
बी.ए. भाग - २

# रिपोस्ट

अगदी कुठूनही
अन कुणालाही दिसेल
इतकं पांढरशुभ्र अंतर
नेहमीच राखून ठेवलस तू
आपल्या दोघांत.

नेहमीच ताणून धरलंस एक टोक
निसटू नये म्हणून
मग अपरिहार्य होतच मला
दुसर टोक बंद मुठीत
पकडून ठेवणं.

हळूहळू वितभर
हातभर मग फर्लांगभर
अन आता मैलन मैल पसरत चाललाय
हा पांढरा रंग
पण तू मात्र जपतो आहेस
डोळ्यात तेल घालून
अहोरात्र
कारण
मातीचा डागच काय पण
आभाळाची सावलीही
नको असते तुला.

तुला काय वाटत
तू खिशाल लपवून ठेवलेली
ती गर्द गुलाबी रंगाची पुडी
ठाऊक्र नाही मला?

आणि माझ्या पदराला
असलेली हिरवी गाठ
तूच तर बांधून दिलीस ना.

फक्त तुझा अट्टाहास म्हणून
मान्य केलय मी सगळच
पण
गडद अंधारात
सुरकुती उठण्याच्या भितीपायी
चोरुन श्वास घेताना
किती कोंडमारा होतो
हे लक्षात आलंय कधी?

बघ.. होळी आहे आज
रात्रभर धगधगण्यासाठी
हे शुभ्र अंतर पुरेस आहे तिला,
मग उद्याच्या धुळवडीसाठी
तुझ्या खिशातला गुलाबी रंग
अन माझा हिरवाकच्च पदर...

कु. सिमा आर. पंधराम
बी.ए. भाग - २

## आता येईल ग रंगपंचमी !

तूझ्या ओल्या केसातील
ओघळणाऱ्या थेंबासवे
केसातील माळलेल्या
बकुळ फुलांच्या गजऱ्यासवे
विखुरलेल्या गिरकीने तूझ्या
फुलांच्या रंगांसवे...
आता येईल ग रंगपंचमी
नाजूक रुणझूणत्या तुझ्या
पैंजनींच्या पदरवासवे
किणकिण कंकणाच्या
मुलायम करस्पर्शासवे
गर्भरेशमी सळसळणाऱ्या
तुझ्या मोरपीशी पदरासवे...
आता येईल ग रंगपंचयमी!
काळयाभोर दाटलेल्या अन
वाट पाहणाऱ्या तुझ्या डोळयांसवे
मेंदीभरले हात तूझे
अन माझ्या हातासवे
प्रेमरंगी रंगलेल्या
आपल्या प्रेमासवे...

कु. कृतीका डी. वैद्य
बी.ए. भाग - २

## चिमणीदिवस आहे आज हुरडा

हुरडा
मन हुरडयात आलं सारी विथरली हवा
आता चिमणे कशाला तुझ्या माझ्यात दुरावा....

तुझ्या मऊपखावरी
माझ्या मिरगाचे ऋण
तुला कहणार नाही
माझ्या पेरणीचा सण
नको करु नसधूस
माझा फुलवरा पुस
तशी तशी डोल तू ही
जसं डोलतं कणीस
जिथे जिथे जाणे तुझे तिथे माझा गंध जावा
तुझ्या घरटयामधेही माझा सुगावा पोचावा...
दाणं कवळं कवळं
नको टोकरुस बाई
तुझा चिमणीचा दात
त्याचा काही नेम नाही
खोच दाण्याला पडेल
चोच दुधात बुडेल
कणसाच्या काळजात
काही बाही डहुळेल
तुला गुपीत सांगतो जसा खडा उचलावा
तसा कणसामधून दाणा अल्लाद काढावा...

काय काय सांगू तुला
सुगी सरत चालली
अशा उतारत्यापारी
माझी चिमणी पांगली
माझा होईल कडबा
एका विळयाच्या घावानं
दोन उरतील दाणे
मागे तुझ्याच नावानं
तुझ्या चोचीने एखादा दूर नेऊन टाकावा
पुन्हा कणीस होऊन तुला हुरडा चारावा....

कु. श्वेता ब. वाघ
बी.ए. भाग - ३

# त्यानंतर...

तू दुर्लक्षित केलेल्या
त्या सगळयाच कविता
तुझ्या मर्जीविरुध्द
जन्माला घातालेल्या
अपत्यासारख्या वाटू लागतात मला..

वाटून जात उगाच की
गर्भजलपरिक्षण केल्यासारख
जर दाखवत गेले असते तुला
ओळ न ओळ
तर हा पोरकेपणाचा शिक्का बसलाच नसता
त्यांच्या माथी.
कदाचित जन्मालाच आल्या नसत्या त्या.
मग निव्वळ हया विचाराने
अजूनच ठळक हया विचाराने
अजुनच ठळक होत जातो
त्यांचा पोरकेपणा.

गंमत म्हणजे
तू नाकारलंस तरी
इतरांनी केलेला असतो त्यांचा स्विकार
झालेलं असत वारेमाप कोडकौतूक.

तुला माहित नसेल
पण त्यातल्याच काही
जेव्हा धावत येतात
पुन्हा माझ्याच दिशेने
तेव्हा आजवर न दिसलेली
हजार व्यंग दिसू लागतात मला त्यांच्यात.

तरीही
किती अपुर्ण आहेत हया
अस म्हणावस नाही वाटत
कारण
तू एकदा नुसतं गोंजारलस तरी
परिपुर्ण होणार असतात त्या.
दूर होणार असत त्यांच अपुरंपण
मिळणार असते त्यांना
हक्काची चौकट.

अन नुसत्या हया विचारानेच पुन्हा
तू दुर्लक्षित केलेल्या
आजवरच्या त्या सगळयाच कविता
तुझ्या मर्जीविरुध्द
जन्माला घातलेल्या अपत्यासारख्या
वाटू लागतात मला!......

कु. गौरी जे. धवस
बी.ए. भाग - ३

# त्रिसूत्री जगण्याची

आहार विहार विचारांची
बनवू भक्कम तिवई,
काटेकोर समतोलासाठी,
बदलू या सवयी ।

नको नुसते निरोग,
राखू चांगले आरोग्य,
चौरस आहार पिरॅमिडचे,
प्रमाण ठेवूया योग्य ।

हाडे, स्नायू, हृदयाचे,
पोषण करते कॅल्शियम,
आहाराबरोबर विहाराचे, ?
पाळूया नियम ।

शे.दाणे, फुटाणे, कडधान्याची,
खाऊया उसळ
जंकफूड, फास्टफूड, इन्स्टंट,ची,
नको त्यात मिसळ ।

बदाम, अंजीर, अक्रोडला,
देऊया आहारात स्थान,
पौष्टिकता मिळाल्याने,
उंचावेल आरोग्याची मान ।

शेवगा आहे अमृत वृक्ष,
रोजच्या जेवणात करु समावेश,
नाचणी, तीळ, हरभऱ्याने,
परिपूर्ण आपला देश ।

क जीवनसत्वाचा,
आवळा आहे महाराजा,
विविध रुपात करुनि सेवन,
लुटूया त्याची मजा ।

प्रत्येक घासगणिक हवा,
तंतू रेषामय आहार,
वजन राहील आटोक्यात,
मधुमेह होईल हद्दपार ।

नको जिभेचे चोचले,
नको आवड निवड,
युक्तीने बनवून घालू,
काढू त्यासाठी सवड ।

खरेदी बायकांची मक्तेदारी,
जाऊया बाजारहाट,
विविध रंगी भाज्यांची,
बांधून आणू गाठ ।

नको आकर्षण परदेशीचे,
सभोवतालचा करु स्वीकार, ?
जे पिकते तेच घेतले तर,
पळून जातील सारे विकार ।

कॅल्शियमला विरघळवते पित्त,

अन वाढते खूप उष्णता,
करुनि कर्मे आयुर्वेदाची,
कमी करु या रुक्षता ।
निःशुल्क नि मुबलक,
आहे सकाळचं कोवळं उन्ह,
झपाझप पावले उचलून चालू,
घेऊनिया मौन ।

करुन बघूया क्षमते पेक्षा,
थोडे जास्त काम,
कळेल आपलेच आपल्याला,
किती आपल्यात राम ।

नको ताणतणावाला थारा,
ठेवू पंचकोशाची जाण,
सुदृढ कुटुंब राहील याचे,
ठेवू पदोपदी भान ।

सृजन स्त्रीचा अलंकार,
पोटी वाढविते भ्रूण,
पण वंशवेल जोपासण्या,
आहारशास्त्रात असावे निपुण।

आरोग्याचे गिरवू धडे,
होऊखरी सुगरण,
धकाधकीच्या जीवनातही,
होणार नाही वणवण ।

करु आज संकल्प,
करु अज्ञानाची होळी
आहार, विहार, सद्विचारांची,
खाऊरोज मिष्टान्न पोळी ।।

कुंदन व. पैठनकर
बी.ए. भाग - ३

## मैत्री अशी असावी...

ज्याची होती साधी दुनिया,
त्याला नडली सगळी दुनिया !..
गोरे आले राजे झाले,
गुलाम झाली काळी दुनिया !..
सोबत कोणी रडले नाही,
मागे रडली सारी दुनिया !..
हाती माझ्या पुस्तक आले,
सुंदर झाली माझी दुनिया !..
रंगावरुन भांडत बसते,
पांढरपेशी काळी दुनिया !..
जाणारा तर हसतो आहे,
मागे उरली रडकी दुनिया !..
माणुसकी तर मरुन गेली,
भकास झाली सारी दुनिया !..
प्रत्येकाने इथे थाटली,
प्रत्येकाची न्यारी दुनिया !..
दोन बाहुल्या मला मिळाल्या,
रंगीबिरंगी दिसली दुनिया !..
शेषनाग ना दिसला कोठे,
अधांतरावर दिसली दुनिया !..
कमरेवरती हात ठेवुनी,
वाट पाहते माझी.. दुनिया !..
बुध्दानेही डोळे मिटले,
त्याला दिसली त्याची दुनिया !..

ज्याला मैत्रीचा अर्थ उमगला त्याला आयुष्याचा अर्थ कळला अस मला वाटत आणि स्वतःला फार नशीबवान समजतो की आपल्यासारखे सर्व मित्र मिळाले

मैत्रीवर एक छान कविता
चालता चालता अलगद हात हाती यावा...
हसण्यात अश्रू विरुन जावा
अशी मैत्री असावी.
मनमोकळेपणाने बोलता यावं,
वेळेचंही भान नसावं
अशी मैत्री असावी.
थकल्यानंतर झाडाखाली बसावं
अन्...
न सांगताही मनातलं ओळखावं...
अशी मैत्री असावी.
दोन घडी भेट झाली नाही
तर चुटपुट लागावी...
भेटल्यावर मात्र भडाभडा बोलावं...
अशी छान मैत्री असावी.
एकाचं दुःख दुसऱ्याला कळावं
अन्
आठवण होताच हलकं स्मित झळकावं
अशी मैत्री असावी.
न रुसवा, ना अबोला,
ना ईर्षा, ना बढाया,
ना भूलथापा, ना अविश्वास,
फक्त आनंदच वाटावा....

कु. रसीका एस. कालोकार
बी.ए. भाग - ३

## प्रशांत दामले यांची प्रत्येक स्त्रीने ऐकावी अशी धमाल विनोदी कविता.

पुर्वीचे ते पाहात फोटो
पुन्हा पुन्हा ती हळहळली
तारुण्याची पुन्हा पालवी
मनी एकदा सळसळली

शेंगच होते चवळीची मी
मजवर होते फिदा किती
काय वर्णू मी एकेकाच्या
प्रेमाच्या त्या अजब रिती

थांबत नाही काळ कधी पण
हा तर तारुण्याला शाप
आठवले ते जुने दिवस अन्
बसले घेऊन फोटो व्याप

चिरतरुण का कोणी झाले
कहाणीत ते फक्त असे
क्षणागणिक ते ओसरताना
फक्त मला आरशात दिसे

आरसा हा तर खरे बोलतो
कशास त्याला टाळायाचे ?
आला क्षण तो गोड समजुनी
जीवन पुस्तक चाळायाचे

आज कुणी मज म्हणता काकू
मीच मनाशी हसते रे
किती थापले लेप मुखावर
जग काही का फसते रे ?

वाढू दे वय खुशाल देवा
मनास ठेवी सदा तरुण
परावलंबी करु नको अन
कधी नको रे करु करुण

चार अवस्था मानवजन्मी
कुणालाच नाही चुकल्या
चला दाखवा ऐश्या व्यक्ती
तारुण्याला नाही मुकल्या!!!!

दिक्षांत ध. पाटील
बी.ए. भाग – ३

## पोरीची पसंती आली

पोरीची पसंती आली की
बापाचं काळीज धडधडतं
चिमणी घरटं सोडणार म्हणून
आतल्या आत खूप रडतं

हसरे खेळकर बाबा एकदम
धीर गंभीर दिसू लागतात
पोरीला पाणी मागण्या पेक्षा
स्वतःच उठून घेऊ लागतात

या घरातला चिवचिवाट आता
कायमसाठी थांबणार असतो
म्हणून बाप लेक झोपल्यावर
तिच्याकडे पाहून रडत असतो

अंबुच्या लिंबूच्या करत करत
मोठी कधी झाली कळलं नाही
बापसांगतो तिला सोडून
मला पाणीही गिळलं नाही

दिवसातून एकदा तरी
मायेनं जवळ घ्यावं वाटतं
परक्याचं धन असलं तरी
द्यायला मात्र नको वाटतं

उठल्या पासून झोपे पर्यंत
बाबाची काळजी घेत असते
आज ना उद्या जाणार म्हणून
पोरगी जास्तच लाडाची असते
पोरगी जाणार म्हणलंकी
बाप आतून तुटून जातो

कळत नाही बैठकीतून
अचानक का उठून जातो

इकडे तिकडे जाऊन बाबा
गुपचूप डोळे पुसत असतात
लेकीचं कल्याण झालं म्हणून
पुन्हा बैठकीत हसत असतात

तिचा सगळा जीवनपट
क्षणाक्षणाला आठवत राहतो
डोळयात येणाऱ्या आसवांना
बाबा वापस पाठवत राहतो

बी.पी. ची गोळी घेतली का?
आता कोण विचारील गं?
जास्त गोड खाऊ नका म्हणून
कोण कशाला दटवील गं?

बाबा कुणाचं ऐकत नाहित पण
पोरीला नकार देत नाहीत
तिने रागात पाहिलं की मग
ताटात गुलाबजाम घेत नाहीत

एका अर्थानं पोरगी म्हणजे
काळजी करणारी आईच असते
पोटचा गोळा देणाऱ्याची
कहाणी फार वेगळी असते...

कु. भावना ग. जवने
बी.ए. भाग - २

## पोरीची पसंती आली

जीवनाला हासतांना पाहिले मी
अन् सुखाला नाचतांना पाहिले मी

भर उन्हाला एवढा आला कुठूनी
सावलीला लाजतांना पाहिले मी

काय आयुष्यास सांगू हे कळेना
वेदनेला चालतांना पाहिले मी

एवढी देऊ नको ग्वाही जगाची
हर क्षणाला धावतांना पाहिले मी

कीव येते रंजल्यांची, गांजल्यांची
सौख्य त्यांना मागतांना पाहिले मी

ज्ञान सारे वाटले जेव्हा जगाला
व्याप मागे लागतांना पाहिले मी

काय झाले या मनाला देव जाणे
जीव त्याला लावतांना पाहिले मी

जाणिले नाही जगाने मोल जेव्हा
वेगळे जग थाटतांना पाहिले मी

होत नाही कदर जेथे भावनांची
स्वप्न तेथे जाळतांना पाहिले मी

दृष्ट ना लागो कुणाची मोगऱ्याला
कुंतलावर भाळतांना पाहिले मी

होत आहे रोज बाधा मी पणाची
तर्क सारे टाळतांना पाहिले मी

कु. शितल पी. घाटोळ
बी.ए. भाग - २

# नियती

यती येथे,
आपण प्यादे पटावरी !
तुझे नी माझे इथे न चाले,
अवघा खेळच तिच्या करी !!

उगाच टाहो फोडूनिया का ?
नशिबा वरती सुनासुनी !
कर्माचे तू भोग भोगतो,
नशिबाचा तू, तुझ्या धनी !!

जे जे पदरी पडले ते ते,
गोड मानुनी चालावे !
हिशेब असतो कर्माचा तो,
कधी घ्यावे अन कधी द्यावे !!

नको भांडणे फुकी बढाई,
इथे लढाई नियतीशी !
शक्ती अपुरी तुझीच पडता,
उगा पडावे तोंडघशी !!

कोण धन्य अन कोण करंटा,
चुटकीसरशी दान मिळे !
कुठे भिकारी होतो धनी अन् ,
भिकाऱ्यास बघ राज्य मिळे !!

खरे मान तू अथवा खोटे,
निखळ सत्य हे जगती असे !
कर्मफलाचा तुझ्या माणसा,
हिशेब नियती करीत असे !!

भले भले आले नि गेले,
कुणी न उरला अढळ इथे !
वेळ संपला, बोजा उचला,
तुला ना उरले स्थान इथे !!

माझे माझे उराशी कवळून,
उगा बसून तू राहू नको !
आज वाटते तुझे तुझे जे,
उद्या भरवसा ठेवू नको !!

होत्याचे ती नव्हते करते,
हा हा म्हणता गजब घडे !
दिमाख दावी अस्मानाचा,
क्षणात धाराशायी पडे !!

काठावरती बसून राहिली,
खोल बावडी जगताची !
नियती हाती रहाट फिरतो,
नित्य परीक्षा जगण्याची !!

निखळ जळासम जगणे व्हावे,
मिसळून जावे दुज्या सवे !
साखर अथवा क्षार मिळावा,
रुप लेवुनी घ्यावे नवे !!

नको लढाई नियती संगे,
कर्म आपुले करत रहा !
तुझाच उगवून दिवस एक मग,
सूर्य तुला वश होई पहा !!

कु. प्रगती ल. दहाट
बी.ए. भाग - २

# इंग्रजी विभाग

# Challenges Before Indian Youths In 21st Century and The Constitution of India

Nature of challenges before youth are multifaceted, multidemensional and innumerable. Basically their nature is social, economic, political, cultural, educational, psychological, religious, legal judicial, environmental and administrative. These challenges cum problems of severe nature are encircling the youths and their frequency is considerably increased. As a result they posed a great danger before the state and society and various economic, political; cultural, educational, psychological, religious and legal systems of civil society if this is the goal to establish civil society in Indian political system for which the government has faced agitations of civil society people recently to eradicate corruption in politics and in overall administrative appraratus of the state by demanding strong Lokpal who will check corruption in public life and facilitate the process of establishment of civil society in India.

We were under the this impression that once we get political independence, freedom from foreign yoke, once the constitution is framed and popular government of free nation is formed, then out all types of problems along with their age old miserable plight either shall vanish or come to an end. But this has not happened. On the contrary the socio-economic, political, cultural, educational, psychological, religious, legal and security problems have been aggravated manifold over the years.

Challenges Before Youths in Present Scenario

Let us describe clearly the challenges which Indian society, Indian polity and Indian economy is facing. Exactly these are the challenges/dangers before the youth of a nation which is making. The vollowing arethe grave challenges before youth. these are casteism, communalism, sectarianism, regionalism. illiteracy, socio-economic inequality, ignorance, rampant superstitions, (social, cultural and religious) linguism, poverty, unemployment, malnutrition, regional imbalances in economic and industrial development, economic disparity in income, rampant-curruption in government, administration, police, judiciary, politics, education, higher education, military, media. Private sector, internal terrorism, cross border terrorism, religious fundamentalism, fanticism, naxalism, environmental pollution, caste corruptionm intellectual corruption, mental corruption, non functioning of government at center and state level, decline of parliament, state legislatures, mistrust in political institutions on the part of the people (i.e. political parties, pressure groups, socio economic employees associations) growing crime, violence against women, children and Dalists especially belonging to scheduled

castes and scheduled tribes. In a nut shell, present day youth is surrounded by aforesaid challenges and the youth is confused and perplexed because he/her is not acquainted with this actual state of affairs because of faulty education system in which he has not been socially, intellectually, academically and morally oriented to understand, analyzae, assess and act rationally and scientifically to overcome with these challenges. Present education system has not been freed from religious conservatism and orthodoxy right from primary education to higher education. There is a need to cleanse the educational system in India which stands to protect and support the interest to handful people of upper strata society at the cost nof vast suffering poor majority. Even after 65 years of our independence the youth in India has not been liberated socially, mentally, culturally, intellectually due to tremendous impact of casteism, communalism, fanaticism and non separation of religion from polities in spite of the principle of secularism incorporated in the constitution of India. The rulers, administrators, politicians, academicians, bureaucrats, judiciary, all institutions of socio, economic and political life made total mockery of secularism. In fact, secularism should have been guiding force for the rulers, politicians and intelligentsia in public life. But unfortunately by mixing religion with politics the caste Hindus vitiated politics and public life. Consequently, this created lot of problems in implementing the Constitution of India, public policy and revolutionary legislations in our country. The secular fabric of Indian polity enshrined in the Constitution has been totally defeated.

Why the youth of this nation is suffering, because their problems has not been addressed despite they constitutes 34% population in India. Youth comprises of young people both male and female. Generally young people between the age goup of 18-24 are considered as youth. This criterion of youth can be stretched up to the age of 35 years. The youth is a state in between childhood and adulthood. It is also called as adolescence, teenage or kid. Youth means freshness, good appearance, charm, energy enthusiasm, spirit, strength, power and pleasant future.

Our forces i.e. military force army, air force, navy, police force, paramilitary force like BSF, CRPF, SRP,RPF,ITBP,NSG Rapid Action Police Force Coast - Guard and many other forces constituted from time to time, plenty of government as well as private security forces are heavily dependent on youths. One cannot imagine the existence of these forces without youth.

Whether it be all India services or State services or service form class I to class IV, the machinery of civil services are heavily rely on the youth of the nation. This indicates that how youth occupies significant and prominent position in the life of the nation.

Today, youths are not only perplexed but they are terribly depressed, disappointed, discouraged because he has been caught by innumerable problems

as mentioned above. In fact, the solutions to solve these problems have already been provided by our framers of the constitution in the constitution itself. But, unfortunately, youth does not know the constitution of India. He has not been told or taught purposefully about the constitution. Ever since the constitution was brought into force in our country youth was made ignorant about the plenty of provisions, schemes, plans, programmes for youth welfare, devewlopment and empowerment in the constitution of India. Toadya the condition of youth class, in our country is not only pitiable but miserable also the youth is equally suffering along with other deprived classes in whose favour the constitution of India has not been implemented in letter and spirit over last 62 years since its inception. This is in fact sorry state of affairs on the part of those who are at the helm of affairs.

Use of youth as Tool for votes Bank politics

The rulers, successive government at Centre and States, policy makers, decision makers, decision makers, administrators, politicians, political parties and political institutions only used them as tool for their nefarious political design. Political class and political offices considered the youths as their vote bank. At the same time other institution in society like social economic, cultural, educational and religious life did not play any meaningful role in sensitizing, enlightening and educating the youth with a view to channelize their energy, power, spirit and enthusiasm for nation building and creating civil society. Political class over the years got succeeded in deceiving and making them fool by grabbing their votes for selfish sinister design for more than 62 years, without addressing their socio economic and educational problems. The present governments along with successive government have miserably failed to ensure their political participation in the governance of country and ensure their share in power knowledge and wealth of nation.

Youth's Responsibility

The solution of challenges before youth finds in the Constitution of India itself. The Constitution has given certain fundamental rights. These rights are political and civil in nature. These civil and political rights have established only political democracy but hard reality of social life is that merely political democracy is meaningless unless social and economic democracy lie at the base of it to establish egalitarian society or in other words social and economic equality. The makers of the constitution have already incorporated Directive Principles of State Po9licy in the constitution. These principles are constitutional directives given to state (Centre and Sates) to follow them strictly in letter and spirit in the governance of the country. The nature of directives are social and economic and these directivews are not merely guidelines to the state but those directives are constitutional and political obligation

put on the state. Executive as well as legislative organs of the government have to keep these precious constitutional directives in mind while framing the policies and making laws for the betterment of society. These directives are more important than fundamental rights, because they are manifestos of aims and objectives of the constitution to bring about revolutionary social and economic changes in existing caste ridden, communal, persecuted and capitalist Indian society. Merely saying that the nature of directives principles is not justiciable and they are not enforceable like fundamental rights, that amount to commit a fraud on the constitution. Well educated youths should try to understand the conspiracy hatched by the ruling class in consonance with bureaucracy, judiciary, so called intellectual class and media. Overall, it appears crystal clear on the part of those who are vested with ruling power that to ignore directive principles of state policy which are capable enough to change an age old discriminatory social and economic structure and unequal social order of Indian society and instead of that to establish egalitarian new social and economic order of social and economic justice. This is the greates challenge before the youth especially well educated youth of the nation to get them fully acquaint with revolutionary living document of constitution which is supreme in the life of the Indian citizen. Now, the time has come to stand unitedly against this sinister design of the handful upper strata ruling people wo are against these life giving principles and assert themselves for implementation of directive principles. This is te responsibility of youth class particularly educated youths.

So far as responsibilities of youths are concerned they are expected to take gigantic task to remove ignorance superstitions, illiteracy, uncleanliness in their neighbourhood. Youth are also expected to inculcate can moral and constitutional values on the people who are living in their vicinity. The youths can take up the task to educate the people in slums or under developed layouts in cities and areas in villages and towns normally found full of dirt and stink. The youth may play very meaningful role to convince and educate unruly people by inculcating the importance of cleanliness on their minds and make aware poor, ignorant and uneducated people how bot dirt and overall uncleanliness is hazardous to their health and environment. Moreover, the youths are expected to take the task of national literacy mission and they should take it as their mission of life at least to literate a one person in their life.

Ku. Kajal L. Parise
B.A. III

# Sharing an Inspirational story
# A Crow and Garuda

---

"Just Drop - Let Go"....!!!

Once a Crow, holding on to a piece of meat was looking for a place to sit & eat.

However, a flock of eagles were chasing it. The crow was anxious and was flying higher and higher, yet eagles were after the poor crow.

Just then "Garuda" saw the plight and pain in the eyes of the crow. Coming closer to the crow, he asked :

"What's wrong? You seem to be very "disturbed" and in "stress"?..

The crow cried "Look at these eagles!! They are after me to kill me",

Garuda being the bird of wisdom spoke "Oh my friend!! They are not after you to kill you!! They are after that piece of meat that you are holding in your beak". Just drop it and see what will happen.

The crow followed the instructions of Garuda and dropped the piece of meat, and there you go, all the eagles flew towards the falling meat.

Garuda smiled and said "The Pain is only till you hold on to it" Just Drop" it.

The crow just bowed and said "I dropped this piece of mat, now, I can fly even higher".

There is a message for us from this story too :

1] people carry the huge burden called "Ego," which creates a false identity about us, that we create for ourselves saying "I need love, I need to be invited, I am so and so... "etc..." Just Drop....

2] People get irritated fast by "other's actions" it can be my friend, My parent, My children, My colleague, My life partner.... and I get the fumes of "anger"... Just Drop....

3] People compare themselves with others... in beauty, wealth, life style, marks, talent and appraisals and feel disturbed... We must be greateful with what we have... comparisons, negative emotions... " Just Drop....

**Ku. Mohini S. Bhange**
B.A. Part - 2

# THIS IS A SOUL WINNING MESSAGE

My house, my car, my children, my certificates, my job, my husband, my wife, my families, my clothes, my SHOE....
My ! My!! My!!! What is this life worth?

A man was informed about the death of his father, but he tarried. When his father started smelling, their neighbours took his father to the mortuary for preservation.

A week later, he went to the mortuary to see the corpse of his father. When he was about to enter the place, there was a poster placed at the entrance of the mortuary, of which no one can escape it. it read :

"WE WERE LIKE YOU BEFORE, BUT WE ARE HERE NOW."
The young boy read it, but it didn't make any sense tohim. He went inside, checked the corpse of his father, after a few minutes, he made his step out. As he was about to step outside, he saw another inscription placed on a strategic location, which no one will escape. it says :

"YOU WILL SOON BE LIKE US."
This last word touched his stone heart and he repented from that moment. From that moment, he understood.

Everything here on earth is like a dream, a vapour. Life itself is not real, as everything is temporal. You will soon be like those that were once living, eating, sleeping, walking, talking, laughing here on earth, but today.....
They're NO MORE.

When he got to his father's mansion, there was nobody to talk to, his father left his shoes, clothes, money, bed, cars, EVERYTHING

As he was searching his father's wardrobes, he saw untouched brand new dollars, well packed and arranged, but the owner of the money was in the mortuary. The young boy remembered.

"WE WERE LIKE YOU BEFORE, BUT YOU WILL SOON JOIN US.." He cried the more.

You eat chicken with vegetables and fish, turkey, meat, fried rice, and drink wine today, but tomorrow, your flesh becomes food for maggots.
You drive a nice car today, but tomorrow, a hearse drives you. You live in a mansion today, but tomorrow you live in burial ground. You sleep in a nice bed today, but tomorrow, you sleep inside the Grave!

There is no replacement for your soul? It is priceless, unique and peculiar. The soul is the real you. It leaves on after death.

You will lose everything if you die without GOD and without living for Him.

Please, ruminate on this piece of post, reconcile with your creator, and have a positive change of heart, so that your living on earth shall be to God's Glory and at the end of your sojourning on earth, you will not end in oblivion.

A WORD IS ENOUGH FOR THE WISE.

"Indeed we belong to God, and indeed to Him we shall return."

Ku. Faraha Parveen Rashid
B.A. Part - 2

# Here are 10 top habits of self-made millionaires.

The journey to self-made 'millionaire' status isn't a mystery, nor an obscure, but a journey with laid down principles.

Here are 10 top habits of self-made millionaires.

Principle number #1
Is to get educated, go to seminars, get books and educate yourself, get a mentor, get a coach, be constantly ready to learn new things every single day because the world is changing very fast and you must maintain the pace.

Principle number #2
Is to make sure you do at least 30 minutes of exercise every day. Why do you need to do this? Because it gets your blood pumpig round your body and keep you healthy. It gets your energy level high and gives you the energy to go out and get more actions for your business.

Principle number #3
Is to build relationships with other successful people: this is important because when you all master minds are together, you will only share ideas and operates together through the power of leverage. You also get an increase in your compound knowledge; to get you better and faster results.

Principle number $4
Is to be obsessed with your goals. When you wake up in the morning that's all you think of, when you're having dinner with family and friends that's all you talk about, when you go to sleep that's all you dream of. Be constantly obsessed with your goals.

Principle number $5
Is to dream it and then set it. A lot of people that have this amazing dream or the other, but don't have any plan on how to go about achieving their dreams always end up frustrated. You got to take the dreams from your heart and put them into paper. So you can see exactly where to go and how to; just like a blueprint from A-Z. Here what you're doing is to set your plan in achieving your dreams.

Principle number $6
You see all self-made millionaires have coaches and mentors. Now let me tell you the difference between the two; a coach is someone that gets you to do a thing, while a mentor is someone that gives you the strategies in doing a thing.

You have got to have both; you can't have a big picture without the plan to achieve, and you can't have plans without a big picture.

Principle number #7
Is not spending time with time wasters. Learn to say no to time wasters and identify who the time wasters are. You must learn to say "no" to things. Warren Buffet says "one of the ways he is able to stay wealthy; is by saying 'no' to a lot of opportunities". You don't have to say YES always, the more you say 'yes' to things, the more time they suck from you. Learn to say NO to people and things.

Principle number $8
Is to get up early. We did a research and discovered that a lot of self-made millionaires actually get up early, between the hours of 4-6 a.m. to start up their day's work. This is important, as when you get up early; it gives you more time to do stuffs and draw out your strategies for the day.

Principle number #9
Is having multiple streams of income. This is actually the most important factor in your journey to self-made millionaire status. If you have just one stream of income or a job, practive all the other principles as long as you want, nothing will change. You must have heard of the saying "never put all your eggs in one basket". If you don't find a way to earn money while you sleep, you will work till you die. Invest into multiple stream of income.

Principle number $10
Is that all self-made millionaires use the power of leverage and fast implementation strategies. This means that whatever you're trying to do right now, don't try to do everything yourself, make sure that you're utilizing resources of other people and get other people to do things for you and do it fast.

If you are diligent to follow all these principles then you are on your way to become a self-made millionaire. And i will see you at the top.

Ku. Sanchali V. Kalokar
B.A. Part - 2

# Science of Nadi & Yoga

Nadi is an important concept in Hindu Philosophy, mentioned and described in the sources some of which have about 3,000 years of history. The amount of nadis of the human body are claimed to be up to hundred-of-thousands and even millions. In regard to kundalini yoga, there are three important nadis: ida, pingala, and sushumna (for the alternate names, see the section below). ida lies to the left of the spine, whereas pingala is to the right side of the spine, mirroring the ida. Sushumna runs along the spinal cord int he center, through the seven chakras. Under the correct conditions the energy of kundalini is said to uncoil and enter sushumna through the brahma dwara or gate of Brahma at the base of the spine.

The Shiva Samhita treatise on yoga states, for example, that out of 350,000 nadis 14 are particularly important, and among them, the three just mentioned are the three most vital.

Several of the ancient Upanishads use the concept of nadis (channels). Nadi system is mentioned in the Chandogya Upanishad (8-6 cc. BCE), verse 8.6.6[4] and in verses 3.6-3.7 of the Prasna Upanishad (second half of the 1 millennium BC). As stated in the last,

3.6 "In the heart varily is Jivatma. Here a humdred and one nadis arise. For each of these nadis there are one hundred nadikas. For each of these there are thousands more. In these Vyana moves."

3.7 "Through one of these, the Udana leads us upward by virtue of good deeds to the good worlds, by sin to the sinful worlds, by both to the worlds of men indeed.

The Varaha Upanishad (13-16 cc. CE) further describes it as follows.

"The nadis penetrate the body from the soles of the feet to the crown of the head. In them is prana, the breath of life and in that life abides Atman, which is the abode of Shakti, creatrix of the animate and inanimate worlds.

Functions and activities

In the yoga theory, nadis are said to carry life force energies known as prana. In the physical body, the nadis are channels carrying air, water, nutrients, blood and other bodily fluids around and are similar to thearteries, veins, capillaries, bronchioles, nerves, lymph canals and so on. [2] In yoga theory, the physical body is often referred to as "the gross body"

Int he subtle and the causal body, the nadis are channels for so called cosmic, vital, seminal, mental, intellectual etc. energies and are important for sensations, consciousness and the spiritual aura.

Yoga texts disagree on the number of nadis in the human body. Hatha yoga Pradipika and Goraksha Samhita quote 72,000 nadis, each branching off into another 72,000 nadis, whereas Shiva Samhita states 350,000 nadis arise from the navel center.

All nadis are said to originate from one of two centres; the heart and the kands, the last being an egg-shapedbulb in the pelvic area, just below the navel.

When awakened, kundalini travels upward within Sushumna. The ida and Pingala nadis are often seen as referring to the two hemispheres of the brain. Pingala is the extroverted , solar nadi, and corresponds to the right hand side of the body and the left hand side of the brain. Ida is the introverted, lunar nadi, and corresponds to the left hand side of the body and the right hand side of the brain. These nadis are also said to have an extrasensory function, playing a part in

empathic and instinctive responses. The two nadis are believed to be stimulated through different Pranayama practices, including nadi shodhana, which involves alternately breathing through the left and right norstils, which would theoretically stimulate the left and right sides of the brain respectively. The word nadi comes from the Sanskrit root nad meaning “channel”, “stream” or “flow”. Special breathing techniques are supposed to influence the flow of prana within these nadis. According to this interpretation, these techniques will purify and develop these two energetic currents and may lead to the awakening of kundalini.

Ida, Pingala and Sushumna EditIda is associated with lunar energy. The word ida means “comfort” in Sanskrit. Ida has a moonlike nature and feminine energy with a cooling effect. It courses from the left testicle to the left nostril and corresponds to the Ganges river. Pingala is associated with solar energy. The word pingala means ‘tawny’ in Sanskrit. Pingala has a sunlike nature and masculine energy. Its temperature is heating and courses from the right testicle to the right nostril. It corresponds to the river Yamuna.

The ida and Pingala nadis are often seen as referring to the two hemispheres of the brain. Pingala is the extroverted, solar nadi, and corresponds to left hemisphere. Ida is the introverted, lunar nadi, and refers to the right hemisphere of the brain. Ida nadi controls all the mental processes while Pingala nadi controls all the vital processes.

Sushumna, which interpenetrates the cerebrospinal axis, and in swara yoga is associated with both nostrils being open and free to the passage of air. The lunar channel ida is pale in color and located on the left side. It is associated with feminine attributes, the moon and an open left nostril. The solar channel Pingala is red in color and located on the right side. It is associated with masculine attributes, the light of the sun, and an open right nostril. Sushumna connects the base chakra to the crown chakra. It is very important in Yogaand Tantra in general. In Raja yoga or Yoga of Patanjali, when the mind is quentened through Yama, Niyama, Asana and Pranayama the important state of Pratyahara begins. A person entering this state never complains of Dispersion of Mind. This is characterized by observing the movements/jerks in sushumna in the subtle body. Sushumna makes the way for the ascent of kundalini.

The medieval Sat-Cakra-Nirupana, one of the later and more fully developed classical texts on nadis and chakras, refers to these three main nadis by the names Sasi, Mihira, and Sushumna.

In the space outside the Meru, the right apart from the body placed on the left and the right, are the two nadis, Sasi and Mihira. The Nadi Susumna, whose substance is the threefold Gunas, is in the middle. She is the form of Moon, sun, and fire even water also; her body, a string of blooming Dhatura flowers, extends from the middle of the Kanda to the Head, and the Vajra inside Her extends, shining, from the Medhra to the head.

Ku. Kalyani R. Katharne
B.A. Part - 3

# अहवाल

## आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा
## दिनांक २ सप्टेंबर २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८

आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचे पावसाळी क्रिडा स्पर्धात महाविद्यालयाचा सहभाग होता. विद्यापीठाच्या आदेशान्वये आंतर महाविद्यालयीन खेळ व क्रिडा स्पर्धेमध्ये खालील खेळांचा समावेश आहे. ते पुढीलप्रमाणे कबड्डी, हॉलीबॉल, कुस्ती, खोखो, क्रॉस कंट्री मैदानी स्पर्धा इ. स्पर्धेत महाविद्यालयाने सहभाग घेतला.

१. क्रॉस कंट्री :-

महाविद्यालयाने विद्यापीठ क्रॉस कंट्रीत दि. २/९/२०१८ रोजी आयोजीत केली होती. हयांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले व तिने उत्कृष्ट प्रदर्शन केले. क्रॉस कंट्री मध्ये महाविद्यालयातून भाग घेतला होता.

२. खो-खो (मुली) :-

विद्यापीठ क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने दि. २७/०९/२०१८ व दि. २८/९/२०१८ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या क्रिडांगणावर घेण्यात आल्या त्यात महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

३. कबड्डी मुली :-

विद्यापीठ पावसाळी स्पर्धात महाविद्यालयाचे कबड्डी मुलींच्या चमुने दि. २५/९/१८ ते २५/९/१८ ला लोक महाविद्यालय वर्धा यांच्या क्रिडांगण येथे विद्यापीठ स्पर्धेत भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

४. खो-खो (मुले) :-

विद्यापीठ क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने दि. २४/९/२०१८ व दि. २५/९/२०१८ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या क्रिडांगणावर घेण्यात आल्या. त्यात महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

५. कबड्डी मुले :-

विद्यापीठ क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाची मुलांची चमु संघाने दि. ३/१०/२०१८ ते ४/१०/२०१८ या कालावधीत लोक महाविद्यालय वर्धा यांच्या क्रिडांगणावर घेण्यात आल्या होत्या त्याच महाविद्यालयाच्या चमुने भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

६. व्हॉलीबॉल मुली :-

विद्यापीठ क्रिडा स्पर्धात महाविद्यालयाची मुलींची चमु संघाने दि. ९/१०/२०१८ ते ९/१०/२०१८ या कालावधीत जी.एस. कॉमर्स कॉलेज वर्धा येथे सहभाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

७. मैदानी स्पर्धा (मुले ) :-

विद्यापीठाची मैदानी स्पर्धा दि. १२/१०/२०१८ ते १५/१०/२०१८ या कालावधीत घेण्यात आली. त्यात १) संकेत भोयर बी.ए. भाग १.२०० मीटर धावणे, उंच उडी, ८०० मीटर धावणे २) प्रमोद बाहे याने २०० मीटर धावणे, उंच उडी ४०० मीटर धावणे, या स्पर्धेत सहभाग घेतला व महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

८. मैदानी स्पर्धा (मुली ) :-

विद्यापीठाच्या क्रिडांगणावर दि. १२/१०/२०१८ ते १५/१०/२०१८ या कालावधीत कु. रुपी साबळे बी.ए. भाग १.१०० मीटर धावणे ५ कि.मीटर धावणे, ४०० मी. धावणे यात हिने महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

९. कबड्डी (मुली ) :-

कबड्डी मुलीचे निवड चाचणी करिता दि. ८/१०/२०१८ ते १०/१०/२०१८ या कालावधीत रा.तु.म. नागपुर विद्यापीठाच्या क्रिडांगणावर स्पर्धा घेण्यात आली. कु. रुपाली साबळे महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

१०. कुस्ती मुली :-

दि. १४/१२/२०१६ ते १६/१२/२०१६ या कालावधीत ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपुर यांच्या कुस्ती क्रिडांगणावर स्पर्धा घेण्यात आली. तत कु. अश्विनी जुवारे या विद्यार्थीनीने महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

११. कुस्ती मुले :-

दि. १४/१२/२०१६ ते १६/१२/२०१६ या कालावधीत ज्योतीबा शारीरिक शिक्षण महाविद्याय नागपुर यांच्या कुस्ती क्रिडांगणावर स्पर्धा घेण्यात आली. त्यात १) संदीप राठोड २) सैय्यद सुलेमान राजा ३) विलास कालोकर या विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

१२. कबड्डी मुली :-

कबड्डी मुलीचे निवड चाचणी करीता दि. ३०/९/२०१८ ते २/१०/२०१८ या कालावधीत रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या क्रिडांगणावर स्पर्धा घेण्यात आली. त्यात संदिप चोकोने बी.ए. भाग २ या विद्यार्थ्याने विद्यापीठाची निवड चाचणी दिली त्याची निवड झाली. त्यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

१३. कबड्डी मुले :-

कबड्डी मुले विद्यापीठाच्या निवड चाचणी करीता दि. ९/१०/२०१५ ते १०/१०/२०१५ या कालावधीत रा.तु.म. विद्यापीठाच्या क्रिडांगणावर घेण्यात आली. त्यात १) रोशन ठाकरे २) सुहास राऊत्त या विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. त्यात रोशन ठाकरे याची कलर होडर म्हणून अश्वमेघ म्हणून निवड झाली.

१४. खो-खो मुली :-

खो-खो मुली विद्यापीठ निवड चाचणी करीता दि. ७/११/२०१६ ते ९/११/२०१६ या कालावधीत नागपूर विद्यापीठाच्या क्रिडांगणावर स्पर्धा घेण्यात आली. त्यात कु. करिश्मा जिवतोडे, कु. निकिता आत्राम हिची निवड राखीव खेळाडू म्हणून झाली. या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची निवड चाचणी दिली त्यात त्यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

१५. व्हॉलीबॉल मुले :-

व्हॉलीबॉल मुले दि. २७/१०/२०१६ ते २९/१०/२०१६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा यांच्या क्रिडांगणावर १) गजानन निचीकर २) ..................... ...................... बी.ए. भाग १ या विद्यार्थ्याने निवड चाचणीत महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

१६. व्हॉलीबॉल (मुली ) :-

व्हॉलीबॉल मुली दि. ११/१०/२०१५ ते १३/१०/२०१५ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या क्रिडांगणावर १) कु. निकीता आतराम बी.ए. भाग ३ या विद्यार्थीनीने निवड चाचणीत महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले व तिची राखीव खेळाडू म्हणून निवड झाली.

# वार्षिक अहवाल ग्रंथालय विभाग

स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास शिक्षण संस्था द्वारा संचालीत स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय १९९९ मध्ये सुरु करण्यात आले असून त्यामध्ये ग्रंथालय विभाग हा स्वतंत्र आहे. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचन करता यावे याकरिता ४0 ते ५0 विद्यार्थी बसता येईल अशी व्यवस्था केलेली आहे.

महाविद्यालयामध्ये ग्रंथालय समितीची स्थापना केलेली असून ही समिती ग्रंथालयाच्या विकासाकरिता कार्यरत असून समितीने सुचित केलेल्या नियमांचे पालन करण्यात येते.

चालु शैक्षणिक सत्रामध्ये ग्रंथालयाच्या सभासदांची संख्या आहे. ग्रंथालयामध्ये ग्रंथसंग्रहाची किंमत ३,४६,३५४.२५ रु. असून त्यांची संख्या २१२६ आहे. ग्रंथालयामध्ये UGC Inflibnet N list लावले असून ग्रंथालयामध्ये संगणकीकरणाचे काम चालु आहे. ग्रंथालयामध्ये एकूण ५ वर्तमानपत्रे येत असून मराठी ३, हिंदी १ इंग्रजी भाषेतील १ आहे. २६ जर्तेल व मॅग्झीन व स्पर्धा परिक्षेची पुस्तके आहे.

ग्रंथालयातील उपक्रम

१. डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती (९/८/२०१८) :-

ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. नितीन माथनकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एम.डी. झलके उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. टि. आर. बन्नगरे व प्रा. डॉ. एन.डी. गौरखेडे उपस्थित होते.

२. ग्रंथालय उद्‌बोधन वर्ग दि. १४/५/२०१८ :-

विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या कार्यपध्दतीची माहिति व्हावी तसेच ग्रंथालयामध्ये दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिति व्हावी याकरिता दि. १४/५/२०१८ ला ग्रंथपाल डॉ. राजेंद्र माणिकपुरे यांनी उद्‌बोधन वर्गाला देवघेव सेवा, .......... सेवा, नियतकालीक सेवा, इंटरनेट सेवा, इंटरलायब्ररी लोन सेवा, उत्कृष्ट वाचक पुरस्कार संगणकीकरण या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रा. झलके उपस्थित होते.

३. वाचन प्रेरणा दिवस दि. १५/१०/२०१८ :-

डॉ. अब्दुल कलामांच्या जीवन कार्याचा परिचय व लाभार्थ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. नितीन माथनकर सर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून

प्रा.डॉ. माळोदे सर, आर्ट, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय आर्वी हे उपस्थित होते. लेखक भेट या सदराखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचा लाभ प्राध्यापक व विद्यार्थी यांनी घेतला.

**ग्रंथ प्रदर्शनी दि. १२/३/२०१९ :-**

स्व. वसंतराव कोल्हटकर पुण्यतिथीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाद्वारे ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन दि. १२/३/२०१९ ला करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन माथनकर तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. रविंद्र टाकळे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन फित लावून कु. सोनाली टिके ग्रंथालय सल्लागार विद्यार्थी प्रतिनिधी हिने केले. तसेच कात्रण प्रकल्पाचे विमोचन कु. मयुरी लढे हिच्या हस्ते करण्यात आले. या ग्रंथप्रतिनिधीचे तथा प्राध्यापक व विद्यार्थी यांनी घेतली.